
पुणे, किशोर– वर्ष ५४, अंक २ रा, फेब्रुवारी २०२५, (मासिक)– किंमत रु. ७/– पृष्ठे– ५२
Pune, Kishor- Vol. 54, Issue- 2, February 2025 (Monthly)- Price Rs. 7/- Pages- 52


# किशोर

फेब्रुवारी २०२५



# राजा शिवाजी

■ अनिकेत देशमुख



रयतेच्या कल्याणासाठी
स्वराज्याच्या स्थापनेसाठी
जो खेळला जीवाशी....
राजा शिवाजी माझा राजा शिवाजी...
राजा शिवाजी आमचा राजा शिवाजी....

बहुजनांना उभे केले
अख्खे स्वराज्य पदरात दिले
शहाजीराजे, जिजाऊंचे
स्वप्न उतरविले सत्याशी
राजा शिवाजी माझा राजा शिवाजी...
राजा शिवाजी आमचा राजा शिवाजी.....

दीनदुबळ्यांचे रक्षण केले
स्त्रियांना संरक्षण दिले
जातीपातीला दूर सारूनी
नाते जोडले समतेशी
राजा शिवाजी माझा राजा शिवाजी...
राजा शिवाजी आमचा राजा शिवाजी....

सुलतानीशी झुंज दिली
मर्द मावळ्यांनी शर्थ केली
गनिमी कावा तंत्र ज्यांचे
नजर होती किल्ल्यांवरी
राजा शिवाजी माझा राजा शिवाजी...
राजा शिवाजी आमचा राजा शिवाजी....

शिवतेजाने महाराष्ट्राला उजळविले
स्वराज्याला सुराज्य बनविले
शिवनेरीला वंदन करितो
माथा टेकवितो रायगडाशी
राजा शिवाजी माझा राजा शिवाजी...
राजा शिवाजी आमचा राजा शिवाजी.....

संपर्क : ९६८९६३४३३२

**किशोर** फेब्रुवारी २०२५, वर्ष ५४ वे, अंक २ रा, माघ- फाल्गुन शके १९४६

**संपादक :**
कृष्णकुमार पाटील, संचालक,
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

**प्रकाशक :**
विवेक उत्तम गोसावी
नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई

**निर्मिती अधिकारी :** हेमंत बाबर

**अक्षरजुळणी :** किशोर विभाग

**कार्यकारी संपादक :**
किरण केंद्रे

**वितरण व्यवस्थापक**
जी. आर. पानसरे

**मुखपृष्ठ :** पूजा शेळके
संपर्क : ८४२४०४५४१५

**चित्रांकन :** *घनश्याम देशमुख, रेश्मा बर्वे, धनश्री केळकर, राजेंद्र गिरधारी, अजय विभुते, योगिता धोटे, लोकेश कुलकर्णी, अमृता ढगे, विनोद गायकवाड, माईंडईट संवाद, जैत्र डिजिटल*

# अंतरंग


- राजा शिवाजी ........ *अनिकेत देशमुख* ........ ०२
- युगप्रवर्तक छत्रपती शिवाजी महाराज ........ *मोगल जाधव* ........ ०६
- स्वच्छता पुजारी ........ *मनोहर आंधळे* ........ ०९
- म्यॅडम दमानं सांगा की.... ........ *दत्तात्रय तरळगट्टी* ........ १०
- म्हाताऱ्याची चूळ आणि निवतीचे खडक... ........ *सुहास बारटक्के* ........ १२
- मराठी - इंग्रजी शब्दकोशाचा जनक : जेम्स थॉमस मोल्सवर्थ...... *अविनाश हळबे* ........ १५
- चला चित्र रंगवूया...!.. ........ *रेश्मा बर्वे* ........ १९
- AI आणि चित्रपट उद्योग.. ........ *अच्युत गोडबोले* ........ २०
- सोन्याचा दिवस ........ *मल्हार अरणकल्ले* ........ २२
- काहीतरी ........ *अमित बाविस्कर* ........ २५
- काठी अक्षरांसाठी ........ *डॉ. नीलिमा गुंडी* ........ २६
- झोपलेली बाग ........ *विजय पाडळकर* ........ २८
- महाराष्ट्र राज्य प्रतिके ........ *विद्या पोळ- जगताप* ........ ३२
- मी पत्रपेटी बोलतेय... ........ *रेणुका दर्शने* ........ ३३
- शान मराठी... ........ *संदीप राठोड* ........ ३७
- कुतूहल. ........ *वसुंधरा भोपळे* ........ ३८

**बालविभाग**

- भावी आधारस्तंभ ........ ४०
- उमलती प्रतिभा ........ ४२
- चित्रकथा : कुणीतरी आहे तिथं ........ *घनश्याम देशमुख* ........ ४४
- शाळा माझी रे मराठी ........ *अमोल टेकाम* ........ ४६

**ENGLISH SECTION**

- School Vegetable Garden ........ ***Sarita Upase*** ........ ४७
- Weighing The Elephant ........ ***Dr. Rasika Thosar*** ........ ४८
- Funny Puzzle ........ ***Ghanshyam Deshmukh*** ........ ५०


ऑनलाईन वर्गणीकरिता : www.kishor.ebalbharati.in

वार्षिक वर्गणीची रक्कम रु.८०/- मनीऑर्डर अथवा कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेच्या पुणे शाखेवरील डिमांड ड्राफ्टद्वारे संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ, या नावाने खाली नमूद केलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावी. धनादेश स्वीकारला जाणार नाही.

**पत्रव्यवहाराचा पत्ता: कार्यकारी संपादक, किशोर, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,** सेनापती बापट मार्ग, पुणे- ४११००४, **संपादकीय** : ०२०- २५७१६१०७, **वितरण व तक्रार** : ०२०-२५७१६२४४,
ई-मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in

... परवा परवा बालभारतीचे 'किशोर' हे मासिक वाचण्यासाठी चालू केले. अतिशय सुंदर छपाई, रंगीत चित्रे पाहून मन भूतकाळात गेले. मी शाळेला असताना बालभारतीसारखी अनेक पुस्तके वाचली आहेत. विद्यार्थ्यांना संस्कार पोषक असे धडे देण्याचा प्रयत्न 'किशोर'च्या माध्यमातून पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाने केला आहे. अशा मासिकातूनच विद्यार्थी घडत असतो. प्रत्येक पाठातून बोध निर्माण होतो. विद्यार्थ्यांना आकलन होईल अशा साऱ्या गोष्टींचा विचार करून ते 'किशोर'मध्ये समाविष्ट केले जातात. हे 'किशोर' मासिक अतिशय सुंदर, वाचनीय असे आहे. त्यातील कथा, कविता असे सारे काही निसर्गाला धरून असते. किशोर मासिकातील रंगीत चित्रे विशेष बोलकी असतात हे वेगळे सांगण्याची गरज नाही. या मासिकामध्ये कोडेसुद्धा असते. अतिशय सुंदर आणि सुबक छपाई हे देखील मासिकाचे एक वैशिष्ट्य आहे. 'किशोर' मासिकास माझ्या हार्दिक शुभेच्छा...।

**दत्तात्रय मानगुडे,**

किर्लोस्करवाडी, ता. पलुस, जि. सांगली- ४१६३०८

'किशोर' मासिकाचा अंक हातात पडताच मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहतो, हा आमचा दर महिन्यातील अनुभव आहे. आम्ही आमच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खातगाव नं. २ ता. करमाळा जि. सोलापूर या शाळेमध्ये किशोरमधील विविध गोष्टींचे नियमितपणे मुलांकडून वाचन करून घेतो. आमची शाळा इयत्ता पहिली ते चौथीपर्यंत असून आम्ही अनेक महिन्यांपासून मुलांकडून किशोर मासिकाचे वाचन करून घेतो. गोष्टींतील आकर्षक चित्र पाहून शाळेतील लहान- लहान मुले त्याचे आपल्या शब्दांत वर्णन करण्याचा प्रयत्न देखील करतात. त्यातून वर्गातील वातावरण अतिशय आनंददायी बनते. त्यामुळे मुलांचा शब्दसंग्रह हळूहळू वाढत आहे. तसेच हे वाचन करताना नवनवीन शब्द माहिती होत असल्याने मुलांचे हळूहळू वाचन सुधारत आहे आणि मुलांना वाचनाची आवडही लागत आहे .

मुलांना नवनवीन, मनोरंजक व विविध माहिती देणाऱ्या ज्ञानवर्धक गोष्टी सचित्र पाहायला, वाचायला मिळत असल्याने त्या गोष्टी मुले मन लावून वाचतात, या गोष्टी वाचून आम्हां सर्वांना खूप आनंदही होतो... 'किशोर'मुळे मुलांना आनंद लुटण्याची एक वेगळीच संधी उपलब्ध होते हे मात्र नक्की. 'किशोर'ची वाटचाल अशीच सुरू रहावी यासाठी आम्हां सर्वांकडून किशोरला खूप खूप शुभेच्छा. 'किशोर' आणि 'किशोर'चे सर्व अधिकारी, कर्मचारी यांचे मनापासून आभार....

**बाळासाहेब बोडखे,** उपशिक्षक

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खातगाव नं. २ ता. करमाळा जि. सोलापूर- ४१३२०३

# ‘माय मराठी’

किशोर मित्रमैत्रिणींनो, आपण दरवर्षी २७ फेब्रुवारी हा महाराष्ट्राचे ज्येष्ठ कवी, साहित्यिक विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस ‘मराठी भाषा गौरव दिवस’ म्हणून उत्साहाने साजरा करतो. एके काळी ‘मराठी असे आमुची मायबोली । परी आज ती राजभाषा नसे’ अशी खंत कवी माधव त्र्यंबक पटवर्धन उर्फ माधव जुलियन यांनी व्यक्त केली होती. अनेक मराठी भाषिकांचे हे दुःख होते. पुढे १९६४मध्ये तिला राजभाषेचा दर्जा मिळाला. यंदा मात्र आपल्या आनंदात, उत्साहात अजून एका चांगल्या बातमीची भर पडली आणि ती आपल्या सर्वच मराठी भाषिकांसाठी मानाची, अभिमानाची, गौरवाची बाब आहे. ही महत्वाची घटना म्हणजे आपल्या माय मराठीला केंद्र शासनाकडून अभिजात मराठी भाषेचा दर्जा बहाल करण्यात आला आहे. ही बातमी ऐकून, वाचून तुम्हांलाही कवी सुरेश भट यांच्याप्रमाणे ‘लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी. जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी. धर्म , पंथ , जात एक जाणतो मराठी. एवढ्या जगात माय मानतो मराठी’ असे म्हणावेसे वाटते आहे ना ? कवी कुसुमाग्रजांच्या “माझ्या मराठी मातीचा लावा ललाटास टिळा” या म्हणण्यानुसार मराठी भाषेचा टिळा आपल्या कपाळावर लावून घेण्याची इच्छा होतेय ना ? मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा म्हणून प्रस्ताव तयार करण्यासाठी शासनाच्या मराठी विभागाने एक समिती स्थापन केली होती. प्रा. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखालील समितीत प्रा. नागनाथ कोत्तापल्ले, प्रा. हरी नरके, प्रा. मधुकर वाकोडे, प्रा. आनंद उबाळे, प्रा. मैत्रेयी देशपांडे, प्रा. कल्याण काळे, सतीश काळसेकर आदी सदस्य होते. या व सर्व मराठी भाषिक लोकांच्या, संस्थांच्या अविरत प्रयत्नांमुळे आपल्या मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला.

मित्रमैत्रिणींनो आपल्या माय मराठीची थोरवी अनेक थोरा मोठ्यांनी मुक्तकंठाने सांगितलेली आहे. ‘माझ्या मऱ्हाठीचिये बोल कवतिके । परि अमृतातेही पैजा जिंके। ऐसी अक्षरेचि रसिके । मेळविन।’ असे आत्मविश्वासाने लिहिणारे संत ज्ञानेश्वर आणि ‘आम्हां घरी धन शब्दांचीच रत्ने । शब्दांचीच शस्त्रे यत्न करूं ।।’ असे मनःपूर्वक व्यक्त होणारे संत तुकाराम हे आपल्या भाषेबद्दल किती जिव्हाळ्याने, ममत्वाने लिहितात. आपल्या मायभाषेबद्दलचे प्रेम मनापासूनच असल्याशिवाय असे हृदयस्पर्शी लेखन होत नाही.कोणतीही भाषा ही तिच्यामधील शब्दांमुळे ओळखली जाते. कोणत्याही शब्दाला नाद, ताल, गंध, रंग, रूप, स्पर्श असतो. यातूनच शब्दशक्ती तयार होते. ही शक्ती कथा,कविता,कादंबरी, नाटक यांतून नवी सृष्टी तयार करते. इतकी जिवंत की आपणालाही आजूबाजूच्या खऱ्याखुऱ्या वातावरणाचा विसर पडतो आणि आपण काही काळ त्या शब्दसृष्टीशी एकरूप होऊन त्यात गुंतून पडतो. कोणीतरी भानावर आणल्याशिवाय शब्दांच्या मोहक मायाजालातून बाहेर पडू शकत नाही. या सृष्टीत असताना आपल्याला ‘स्व’चा विसर पडतो. म्हणूनच म्हणतात भाषेत एकाच वेळी प्रेमाची, भांडणाची, तोडण्याची आणि जोडण्याची शक्ती असते.

संपूर्ण जगामध्ये आता सुमारे ६००० भाषा आहेत असे मानले जाते. या ६००० भाषांच्यापैकी सगळ्यात ताकदवान ज्या भाषा आहेत, त्यात आपल्या मराठी भाषेचा समावेश आहे. सुमारे अकरा कोटी लोकांची मातृभाषा असलेली माय मराठी आता जगामधल्या २० पेक्षा जास्त देशांमध्ये बोलली जाते. तेथे मोठ्या संख्येने मराठी बोलणारे लोक आहेत. अमेरिकेने त्यांच्या देशात बोलल्या जाणाऱ्या २३ भाषांची पाहणी केली, त्यात मराठीचा अधिकृतरीत्या समावेश होता. भारतातल्या विविध राज्यांत मराठी बोलली जाते, तर गुजरात राज्यात ती फार मोठ्या प्रमाणावर बोलली जाते. “भाषा मरता देशही मरतो, संस्कृतीचाही दिवा विझे” असे कुसुमाग्रजांनी लिहून आपल्याला एक इशारा दिला आहे. म्हणूनच आता वेळ आली आहे ती आपल्या मराठीच्या संरक्षणाची, संवर्धनाची. मराठीच्या प्रचार -प्रसाराची. आणि यात तुम्ही देखील खारीचा वाटा उचलू शकता. एकमेकांशी बोलताना, गप्पा मारताना, विविध वस्तू,पदार्थ,उपकरणे,यंत्रे यांचा उल्लेख करताना जाणीवपूर्वक, आवर्जून मराठीचा वापर करा आणि आपल्या आई-बाबांना, ताई - दादाला, शिक्षकांनादेखील तसे करायला सांगा. तुम्हां सर्वांना मराठी भाषा गौरव दिवसाच्या खूप शुभेच्छा.

**किरण केंद्रे**
कार्यकारी संपादक

मोगल जाधव




साडेतीनशे वर्षांपूर्वी महाराष्ट्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराज हे युगप्रवर्तक व्यक्तिमत्त्व उदयास आले. त्यांनी येथील अन्यायी राजसत्तांना आव्हान देऊन स्वराज्याची स्थापना केली. शिवाजी महाराजांचा जन्म १९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवनेरी किल्ल्यावर झाला. त्यांनी शेकडो वर्षे लोकांच्या हृदयावर अधिराज्य गाजवले. शिवरायांचे आजोबा मालोजीराजे यांच्याकडून त्यांना मिळालेला वारसा हा अप्रत्यक्ष होता. मात्र शहाजीराजे आणि जिजाऊ साहेब यांच्याकडून शिवरायांना जे संस्कार मिळाले होते ते प्रत्यक्ष सहवासातून लाभले होते. शहाजीराजांनी संपूर्ण दक्षिण भारतात आपला दरारा निर्माण केला होता. शिवरायांनी स्वराज्य स्थापन केले तेव्हा वडलांचा हा दरारा शिवरायांच्या पाठीशी होता. शहाजीराजांनी स्वराज्याची पार्श्वभूमी तयार केली. जिजाऊंनी स्वराज्याचे स्वप्न शिवरायांच्या मनावर बिंबवले.

'संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग' या एका वाक्यात मध्ययुगीन किल्ल्यांचे महत्त्व रामचंद्रपंत अमात्य आज्ञापत्रात विशद करतात. सतराव्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्ले जिंकूनच स्वराज्य स्थापन केले. किल्ल्यांच्या साखळ्या निर्माण करून स्वराज्याचा विस्तार केला. त्यांच्या ताब्यात सुमारे दोनशे पन्नास किल्ले होते. त्यात जुने जिंकलेले नवे बांधलेले किल्ले होते. शिवरायांचा भर गिरिदुर्ग व जलदुर्गांवर होता. नवे किल्ले बांधणे व जुन्या किल्ल्यांची डागडुजी करणे यासाठी लागणाऱ्या खर्चाकडे ते पाहत नसत.

किल्ले ही स्वराज्याची शक्तिस्थाने होती. किल्ला ताब्यात असला म्हणजे त्याच्या सभोवतालचा शेकडो मैलांचा परिसर नियंत्रणात ठेवणे शक्य होई. किल्ले कारभाराची प्रमुख केंद्रे होती. प्रत्येक किल्ल्यावर चोख व्यवस्था असे. प्रत्येक किल्ल्यावर हवालदार, सुभेदार किंवा सबनीस आणि कारखानीस हे अधिकारी असत. हवालदाराने किल्ल्यावरील सैनिकांची लष्करी बाजू सांभाळायची. सबनिसाकडे मुलकी व जमाबंदीचे काम असे. हे काम किल्ल्यापुरतेच नसून किल्ल्याच्या अमलातील खेड्यांच्या जमाबंदीची जबाबदारी सबनिसाकडे असे. दाणा, चारा, युद्धोपयोगी वस्तू आणि डागडुजी यांची व्यवस्था कारखानीस या अधिकाऱ्याकडे असे.

किल्ल्यांच्या संरक्षणाचे कडक नियम होते. तटावर, माचीवर व किल्ल्याच्या पायथ्याशी चौक्यांवर पहारेकरी असत. गडावर दहा शिपायांवर एक नाईक असे. गडाखालील मैदानी प्रदेश महाल आणि प्रांत असा विभागलेला असे. दोन किंवा तीन महालांचा एक सुभा बनत असे. दोन किंवा तीन खेड्यांच्या समूहांची व्यवस्था कमावीसदाराकडे असे.

पायदळाच्या प्रत्येक तुकडीत नाईक, हवालदार, जमादार हे अधिकारी असत. सरनोबत हा पायदळाचा सर्वश्रेष्ठ अधिकारी असे. घोडदळात बारगीर व शिलेदार असे दोन भाग होते. त्यात शिलेदार, हवालदार हे अधिकारी होते. घोडदळाच्या श्रेष्ठ अधिकाऱ्याला सरनोबत म्हणत. या अधिकाऱ्याच्या हाताखाली सबनीस, कारखानीस, मुजुमदार हे अधिकारी असत. पावसाळ्यात बारगिरांचे घोडे छावणीत ठेवत असत. तेथे चारा व धान्य मिळण्याची व्यवस्था केलेली असे.

प्रत्येक शिपायाला व अंमलदाराला वेतन दिले जात होते. वर्षाचे आठ महिने फौजेला मुलुखगिरी करावी लागे. मुलुखगिरीवर जाताना शिपायांनी आपली बायकामुले बरोबर नेऊ नयेत असा शिवरायांनी सक्त नियम केला होता. शिपाई व घोडेस्वार सैन्यात भरती करताना त्याची वागणूक चांगली राहील असे जामीनपत्र त्याच्याकडून घेतले जात



असे. 'विजयादशमी' हा सैन्य भरतीचा दिवस असे.

'प्रजेचे सुख तेच राजाचे सुख व प्रजेचे हित तेच राजाचे हित' या विचारसरणीला अनुसरून शिवाजी महाराजांची वागणूक होती. स्वराज्याचा कणा म्हणजे शेतकरी. राज्याचा विकास शेती आणि शेतकरी यांच्या विकासाशी निगडीत आहे हे शिवाजी महाराजांनी ओळखले होते. त्यांनी शेतकऱ्यांना विविध प्रकारच्या सवलती दिल्या होत्या. शेती व्यवसाय वाढीला लागावा म्हणून गरजू शेतकऱ्यांना बैल, अवजारे, बी-बियाणे या करता बिनव्याजी कर्ज द्यावे व ते सवलतीने वसूल करावे असे अधिकाऱ्यांना त्यांनी बजावले होते. तसेच शेतकऱ्यांकडून भाजीच्या देठाचीही अपेक्षा करता कामा नये. आंबा, नारळ व पोफळीची झाडी प्रजेला लेकरासमान, ती तोडता कामा नयेत अशी आपल्या अधिकाऱ्यांना शिवाजी महाराजांनी ताकीद दिली होती.

शिवाजी महाराजांनी शेतीबरोबरच व्यापार, उद्योगांना संरक्षण दिले. व्यापार, उद्योगामुळे राज्य भरभराटीला येते हे शिवाजी महाराजांनी ओळखले होते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे मिठाचा उद्योग. शिवरायांनी कोकणातील मीठ उद्योगाला संरक्षण दिले. त्या वेळी पोर्तुगिजांच्या ताब्यातील प्रदेशातून स्वराज्यात मिठाची मोठ्या प्रमाणात आयात होत असे. त्यामुळे कोकणातील स्थानिक मिठाच्या विक्रीवर प्रतिकूल परिणाम होत असे. म्हणून शिवरायांनी पोर्तुगिजांच्या प्रदेशातून स्वराज्यात येणाऱ्या मिठावर मोठी जकात बसवली. पोर्तुगिजांकडून येणारे मीठ महाग होऊन त्याच्या आयातीत घट व्हावी आणि स्वराज्यात तयार होणाऱ्या मिठाची विक्री वाढावी, हा यामागचा हेतू होता.

मध्ययुगीन भारताच्या इतिहासात आरमाराचे महत्त्व ओळखणारे शिवाजी महाराज हे एकमेव राजे होते. आरमार हे शिवरायांच्या लष्करी व्यवस्थेचे प्रमुख वैशिष्ट्य होते. रामचंद्र अमात्य म्हणतात, 'आरमार म्हणजे एक स्वतंत्र राज्यांगच आहे. ज्याच्याजवळ आरमार त्याचा समुद्र' इंग्रज, पोर्तुगीज आणि सिद्धी या शत्रूंपासून कोकण प्रांत आणि सागरी किनारा यांचे रक्षण करण्यासाठी शिवरायांनी स्वतःचे आरमार उभारले. आरमारासाठी नावा, जहाज, वेल्हे, सोट तयार करावे लागतात. त्यासाठी सागवानी लाकूड लागते. हे सागवानी लाकूड दुसऱ्या राज्यातून खरेदी

करावे असा हुकूम शिवरायांनी दिला होता. युद्धाच्या काळात शत्रूपक्षाच्या स्त्रियांना कोणत्याही प्रकारची इजा करता कामा नये, उलट त्यांना अतिशय मानाने वागणूक देण्याचा हुकूम शिवरायांनी आपल्या लष्कराला दिला होता. शिवाजी महाराजांनी अनेकदा आपल्या वर्तनातून स्त्रियांना मानाने कसे वागवावे याचा आदर्श घालून दिलेला आढळतो. मुस्लिम इतिहासकार खाफीखान शिवाजी महाराजांचे चारित्र्य आणि न्यायबुद्धी यांची प्रशंसा करतो. तो लिहितो, ''शिवाजीने सक्त ताकीद दिली होती की, जेव्हा त्याचे सैनिक शत्रूची लूटमार करतील तेव्हा मशिदींना, कुरआण या धर्मग्रंथास किंवा कोणाच्याही स्त्रीस इजा पोहोचता कामा नये. जेव्हा मोहिमेत हिंदू अगर मुस्लिम स्त्रिया कैद होत तेव्हा त्या स्त्रियांचे नातलग येईपर्यंत खुद्द शिवाजी त्यांच्या सुरक्षिततेची काळजी घेत असे.''

माहूरचा किल्ला मुघलांच्या ताब्यात गेला. त्या वेळी या किल्ल्याचा किल्लेदार उदाराम हा होता. त्याच्या मृत्यूनंतर त्याची पत्नी रायबागन या शूर स्त्रीने सर्व सूत्रे आपल्या हातात घेतली. औरंगजेब बादशहाने तिला 'स्त्रीशर्दूल' हा किताब देऊन कोकणच्या मोहिमेवर पाठवले. सोबत कारतलबखान होता. मुघल फौजेतील ही सेनाप्रमुख शिवरायांच्या फौजेशी उमरखिंडीत शूरपणे लढली. मात्र लढाईत तिचा पराभव झाला. ती पकडली गेली. परंतु शिवरायांनी तिला सन्मानाची वागणूक देऊन सोडून दिले.

शिवाजी महाराज दक्षिण मोहिमेवरून परत येत असताना कर्नाटकातील बेलवडी येथील गढी जिंकण्यासाठी मराठा सैन्य गेले होते. तेथील गढीच्या रक्षणासाठी मल्लम्मा देसाई या शूर महिलेने मोठा संघर्ष केला. तिच्या पराक्रमाची वार्ता शिवरायांना समजली. तेव्हा त्यांनी मल्लम्माला आपली धाकटी बहीण मानून तिची गढी व गावे सन्मानपूर्वक तिला परत केली. तसेच तिला 'सावित्री' हा किताब दिला. मध्ययुगीन काळात स्त्रियांची गुलाम म्हणून खरेदी-विक्री होत असे. त्यामुळे स्त्रियांची विटंबना होई. म्हणून शिवाजी महाराजांनी गुलामांच्या खरेदी-विक्रीला आळा घालून स्वराज्यात ही पद्धत बंद केली.

अनेक बलाढ्य शत्रूंशी झुंज देऊन शिवाजी महाराजांनी रयतेच्या कल्याणासाठी 'हिंदवी स्वराज्य' स्थापन केले. आपला देश, धर्म, संस्कृती यांचे रक्षण आणि रयतेचे कल्याण हे विशाल ध्येय समोर ठेवून शिवाजी महाराजांनी कधी शक्ती तर कधी युक्ती यांचा वापर करून हे ध्येय साकार केले. याकरता त्यांनी आपले प्राणही पणाला लावले. निष्ठावंत, विश्वासू अशी गुणी माणसे शिवरायांनी गोळा केली. बाजीप्रभू देशपांडे, शिवा काशिद, तानाजी मालुसरे, येसाजी कंक, मुरारबाजी इत्यादी स्वामिनिष्ठ वीरांनी आपल्या धन्याच्या ध्येयासाठी प्राणांची आहुती दिली.

शिवाजी महाराजांचे धार्मिक धोरण उदार होते. धर्माच्या बाबतीत त्यांनी आपल्या प्रजेत कधीही भेदभाव केला नाही. हिंदूंच्या देवळांप्रमाणे मुसलमानांचे दर्गे व मशिदी यांच्याही देणग्या त्यांनी चालू ठेवल्या. ख्रिस्ती लोकांच्या चर्चलाही त्यांनी जपले. अफजलखानाच्या भेटीच्या वेळी शिवरायांच्या सैन्यात सिद्दी इब्राहीम हा विश्वासू सेवक होता. सिद्दी हिलाल हा त्यांच्या सैन्यातील सरदार होता. स्वराज्याच्या आरमारात दौलतखान हा महत्त्वाचा अधिकारी होता. आग्र्याच्या कैदेत शिवरायांची सेवा करणारा मदारी मेहतर, त्यांचा खासगी कारभारी मुल्ला हैदर हे धर्माने मुस्लिम होते. पण ते स्वराज्याचे निष्ठावंत होते.


छत्रपती शिवाजी महाराजांचे राज्य खऱ्या अर्थाने कल्याणकारी राज्य होते. मुघल इतिहासकार भीमसेन शिवरायांचा उल्लेख 'सिपाही बेनजीर' (अद्वितीय योद्धा) व 'सालेह' (साधू पुरुष) अशा करतो. शिवरायांनी आपल्याला अन्यायाविरुद्ध झगडण्यास शिकवले. त्यांच्यामुळेच भारतीय अस्मिता जागृत झाली. शिवरायांनी वयाच्या पंधराव्या वर्षी स्वराज्याचे तोरण बांधले. सतत तीस-पस्तीस वर्षे त्यांनी अविश्रांत परिश्रम करून स्वराज्याची स्थापना केली. त्यांनी कधीही विश्रांती घेतली नाही. वयाच्या पन्नासाव्या वर्षी म्हणजे ३ एप्रिल १६८० रोजी त्यांनी रायगडावर अखेरचा श्वास घेतला.

विशाल कार्य, निर्मळ चारित्र्य, उदार धार्मिक धोरण, अलौकिक पराक्रम, प्रजावात्सल्य, मुत्सद्दीपणा इत्यादी अनेक गुणांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र संपन्न आहे. म्हणूनच या रयतेच्या राजाला आपण 'युगप्रवर्तक' म्हणतो.

**संपर्क ९६७३०९५७९६**

# स्वच्छता पुजारी

■ मनोहर आंधळे



शिक्षित संत सच्चा म्हणतात लोक सारे
बाबा तुझेच आता गातात गीत वारे!

सश्रद्ध फुंकल्या तू जखमा निरक्षरांच्या
शमल्यात वेदना त्या सर्वत्र पामरांच्या!

डोक्यात गाडगे ते अन् हातात तो खराटा
केलास स्वच्छ इथल्या हृदयातला फुपाटा!

दगडात देव नाही, पाण्यात तीर्थ कुठले..?
कटू सत्य हेचि बाबा आता जगास पटले!

गोपाल देवकीचा ओठात सोबतीला...
अमृततुल्य गोडी दररोज किर्तनाला!

दिधलास बोध बाबा निर्लोभ चिंतनाने
माणूस सुज्ञ व्हावा सर्वत्र शिक्षणाने!

मायबाप थांबवा हो हत्या जनावरांची
केलीस कीव बाबा तू रे मुक्या जीवांची!

उपदेश, भाकरी द्या...दिसता कुणी भुकेला
पाणी तयांस पाजा,असता तहानलेला...!

पिंजून काढला तू प्रत्येक गाव बाबा
माणूस झोपलेला केलास तूच जागा!

डेबूजी स्वच्छतेचा झालास तू पुजारी
श्रमसाधनेत येथे गेली हयात सारी!

तू धन्य मायबापा तुझी ती अमोघ वाचा...
कृतकृत्य शब्द झाला लिहिता मनोहराचा!

संपर्क : ९४२१५१२५७०



दत्तात्रय तरळगट्टी

# म्यॅडम दमानं सांगा की....

‘‘आवं म्यॅडम अवं जरा दमानं सांगा की, लिव्हायला वकुत लागतो बघा. तुम्ही लय भरभर सांगता ब्वॉ; लिव्हताना मला लय पळावं लागतयं बगा वहीवर. जरा दमानं घ्या की.’’ पक्या मॅडमना म्हणत होता. मॅडम मात्र त्यांच्या एकाच लयीमध्ये मुलांना लिहून देत होत्या, आणि इतर मुलेपण गुपचुप लिहून घेत होती. पण पक्या मात्र सगळ्या मुलांच्या मागे मागे पडत होता. त्याचे मित्र त्याला हसत होते. मॅडमपण सारखं सारखं ‘‘मी हळू सांगणार नाही. तुम्हीच भरभर लिहा’’ असं म्हणत रहायच्या.

पक्या एवढा लिहिताना मागे का पडायचा? याचा शोध काही लागत नव्हता. पक्या म्हणजे इयत्ता तिसरीच्या वर्गातील एक सामान्य पोरगा होता. पण सामान्य असला तरी तो सगळ्यांचा लाडका होता. त्याचे पाठांतर चांगले होते. तो विविध खेळ खेळण्यात पटाईत होता. कबड्डी खेळायचा तेव्हा तर त्याची चपळाई मनात भरण्यासारखी होती.

धावण्याच्या शर्यतीत तर तो नेहमी पुढे असायचा. कोणत्याही कार्यक्रमात तो हिरीरीने सहभागी व्हायचा. पण अभ्यास आणि लेखन म्हटलं की पक्याचं तोंड

पाहण्यासारखं व्हायचं.

पक्यानं एकदा वक्तृत्व स्पर्धेत ही भाग घेतला होता. तेव्हा त्याने 'आई' विषयावर दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक पण पटकावले होते. असा पक्या सर्वगुणसंपन्न असला तरी लेखनात मात्र म्हणावी तशी प्रगती करू शकत नव्हता.

'मॅडम जरा दमानं सांगा वं.' हे त्याचे नेहमीचे शब्द. तेही एक हात वहीवर व डावा हात मॅडमकडे करून थांबा असा इशारा केल्यासारखा हात वर करायचा. कधी कधी मागं पडला तर शेजारच्या मित्राच्या वहीत बघून लिहायचा. कधी मित्रांच्या वह्या घरी नेऊन लिहायचा. त्याचे अक्षर फार खराब होते असे ही नव्हते. त्याचे त्याला व मॅडमना वाचता येत होते. मागे जरी पडला तरी त्याचा अभ्यास पूर्ण असायचा.

पक्या आणि त्याचे मित्र एका ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षण घेत होते. शाळा गावाच्या सुरुवातीलाच होती. मस्त झाडं, कौलारू इमारत, मोठ्ठं पटांगण, मोठ्या वर्गखोल्या, व्हरांडा अशी मस्त ऐसपैस पसरलेली शाळा आणि तिचा परिसर होता. उन्हाळ्यात पालकांची थंडाव्यासाठी, दुपारच्या विश्रांतीसाठी गर्दी रहायची असं वातावरण होतं.

अशा मुक्त पोषक, वातावरणात मुलांचा योग्य विकास होत होता. एके दिवशी बदली होऊन एक मास्तर या शाळेत रूजू झाले. मास्तर पस्तीस- चाळीशीतीलच होते, व शहरी भागातील होते. एकदा पक्याच्या वर्गावर मॅडमच्या जागी नवीन मास्तर आल्याने पोरं जरा घाबरली होती, पण त्यांच्या एकंदरीत वागण्या- बोलण्यातून मुलं एकदम ताणरहित होऊन गुरुजींशी सलगी करू लागले.

एके दिवशी गुरुजी मराठी अभ्यास लिहून देताना पक्या एकदम म्हणाला ''म्यॅडम, जरा दमान सांगा की,'' त्याच्या लक्षात नाही आले की मॅडमची बदली होऊन आता आपल्या समोर गुरुजी आहेत. सगळी मुलं- मुली एकदम खो खो करून हसले. पक्याची चूक लक्षात आली. तोही चुकल्यामुळे गालातल्या गालात हसला.

पुन्हा एकदा पक्या म्हणाला, ''गुर्जी, जरा दमानं'' तेव्हा गुरुजींनी त्याला पुढे पहिल्या रांगेत बसवलं, आणि लिहिताना ते त्याच्याकडे लक्ष ठेवू लागले. त्यांना हे लक्षात आले की पक्याचे लिहिणे थोडे विचित्र आहे. अक्षर काढताना तो उलटीसुलटी काढतो. म्हणजे काही अक्षरे खालून वर काढत जातो. जसे आपण ड वरून सुरू करतो तो मात्र खालून उलटा ड काढायचा. त्यामुळे त्याचे लिखाण तो भरभर करू शकत नाही. गुरुजींना हे समजल्यावर पक्याच्या लक्षात ही चूक आणून दिली. त्याच्यासारख्या आणखी काही विद्यार्थ्यांना तशीच समस्या होती ती दूर केली. त्यांना तसा सराव त्यांनी त्यांच्याकडून करून घेऊन त्यांचे लेखन सुधारणा घडवून आणली. पक्या घरी पण जी अक्षरे उलटी काढत होता. त्याचा सराव तो नियमित करू लागला. आता पक्या, ''म्यॅडम किंवा गुर्जी दमान सांगा वं'' असं न म्हणता तो इतरांच्या बरोबरीने लेखन करू लागला.

पक्या एक चांगला, गुणी, हुशार विद्यार्थी म्हणून नावाजला. हळूहळू सांगा म्हणणारा पक्या पुढे जिल्ह्याचा जिल्हाधिकारी झाला. त्याच्यामुळे त्या शाळेची ओळख अख्ख्या जिल्ह्यात झाली. मुलं आता मायबोलीतून शिक्षण घ्यायला जिल्हा परिषद शाळेकडे धाव घेऊ लागली. ग्रामीण भागातील मुलांमध्येही हुशारी असते हे पक्याने दाखवून दिल्याने पक्याचा प्रकाश साहेब झाला.

**संपर्क - ९८८१६२९०४८**

सुहास बारटक्के

भाग २

# म्हाताऱ्याची चूळ आणि निवतीचे खडक

''म्हाताऱ्याची चूळ? म्हणजे नेमकं काय?'' नीलनं आश्चर्यानं विचारलं तेव्हा बाबा म्हणाले ''चला मुलांनो मी प्रत्यक्षच तुम्हांला दाखवतो. थोडं घट्ट धरून बसा; मोठ्या लाटा येऊ लागल्यात, वर ऊनही तापलंय.''

आता ते नवीन दीपगृहाच्या मागच्या बाजूला आले होते. प्रचंड मोठे खडक पाहून तर नील थोडा घाबरलाच. परंतु बाबूलचे बाबा होडीला योग्य दिशा देत, वल्ही मारत हळू हळू खडकांच्या रांगेपाशी आले. एक प्रचंड मोठा खडक ओलांडून ते पुढे आले आणि त्यांनी पाहिलं की त्या खडकाचा पुढील भाग म्हाताऱ्या माणसाच्या टक्कल पडलेल्या चेहऱ्यासारखा दिसतोय आणि एकावर एक असलेल्या त्या मोठ्या खडकांमध्ये तोंडाच्या आकाराची एक अर्धगोल फट आहे. उसळणाऱ्या लाटांचं पाणी त्या खडकाखालून आत शिरल्यावर आतल्या गुहेत उसळत होतं. त्या पाण्याचा एक मोठा फवारा त्या तोंडाच्या आकाराच्या फटीतून बाहेर उडत होता.

फारच सुंदर, परंतु गमतीशीर असं ते दृश्य होते. म्हाताऱ्यानं तोंडात पाणी घेऊन चूळ टाकावी तसं ते पाणी १०-१२ फुटांपर्यंत उडत होतं. होडी अगदी जवळ नेल्यावर त्या पाण्याचे तुषार नील व बाबूल यांच्या अंगावरही उडाले. परंतु बाबूलच्या बाबांनी पुढे अडकण्याच्या भिती असल्यानं त्यांनी होडी वळवली. आता त्यांना नवे दीपगृह अगदी जवळून पहाता येत होते. आपल्या फिरत्या झगझगीत दिव्यांद्वारे ते समुद्रातल्या बोटींना मार्गदर्शन करत होते. दिवसरात्र दिपगृहाचा वरचा भाग





गोलाकार फिरत रहायचा. एखादी विजेरी (बॅटरी) पेटवून इशारा द्यावा तसा काही सेकंद प्रकाश चमकायचा. ती प्रकाशाची भाषा समुद्रात फिरणाऱ्या बोटींना, इंजिनवाल्या होड्यांना बरोबर कळायची. किती सेकंद व किती वेळा हा प्रकाश चमकला त्यावर हे कोणते बंदर आहे ते नेमकं कळायचं. हे दिवे दर १५ सेकंदाला तीन वेळा समुद्राच्या दिशेने प्रकाशझोत टाकत फिरत रहातात. हा प्रकाश झोत समुद्रात अगदी दूरवरूनही दिसतो. तब्बल ३५ किलोमीटर अंतरावरूनही तुम्ही हा प्रकाशझोत रात्री पाहू शकता या बाबतीत सगळं आधीच ठरलेलं आहे. म्हणजे १५ सेकंदात २ वेळाच प्रकाशझोत टाकला तर ते रत्नागिरीचं दीपगृह. जयगडचं दीपगृह १५ सेकंदात ४ वेळा प्रकाशझोत समुद्राच्या दिशेनं टाकतं. म्हणजेच जयगडच्या लाईटहाऊसची वरची चिमणी अधिक वेगानं फिरते. त्यामुळेच कळतं की हे रत्नागिरी नाही, जयगडचं दिपगृह आहे. हल्लीच्या आधुनिक बोटींमधे दिशादर्शक यंत्रे व गूगलमॅप्स (नकाशे) असतात. त्यामुळे त्यांना दिशा कळणे सोपे झाले आहे. मात्र छोट्या बोटी यांत्रिक होड्या, छोटी होडकी यांना मात्र या दीपगृहांचाच आधार असतो. शिवाय बोटीतला नकाशाच जर चुकीची दिशा दाखवू लागला तर दीपगृह हाच शेवटचा अचूक आधार असतो. हल्ली रात्र झाली की दीपगृहाचे दिवे आपोआप प्रज्वलित होतात. कारण त्या दिव्यांना कंट्रोल करणारी स्वतंत्र यंत्रणा असते.

सध्या अशा दीपगृहांशेजारी शक्तीशाली दुर्बिणी उभारल्या आहेत त्यांना रडार असं म्हणतात. ही रडार यंत्रणा समुद्रात थेट ६० किलोमीटर अंतरापर्यंत समुद्रावर लक्ष ठेवते. किनाऱ्याचं संरक्षण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. परंतु अशी यंत्रणा अद्याप निवती वेंगुर्ला इथं उभारण्यात आलेली नाही. लवकरच ती उभारली जाणार आहे. कारण या भागातील समुद्रातही काही अपरिचित म्हणजे नोंद न केलेली जहाजे-स्पीड बोटी येतात अशी कुणकुण सरकारला लागलेली आहे... ही सगळी माहिती सांगता सांगता बाबाही अगदी रंगून गेले होते आणि मुलेही ''चला आज एवढे पुरे आता परत जाऊया. पुढे जुन्या दीपगृहाकडे पहाण्यासारखे काहीच नाही! तरीपण आम्हांला ते पहायचंय'' नील म्हणाला, ''पाहूया पुढे केव्हातरी'' बाबांनी समजूत काढली व त्यांनी होडी किनाऱ्याच्या दिशेने वळवली. भरती संपायच्या आत त्यांना किनाऱ्यावर परत यायचं होतं. एकदा का ओहोटी सुरू झाली की समुद्र त्यांन अगदी आत ओढून नेणार होता. वल्ही मारणं अवघड झालं असतं. होडीतल्या छोट्या यंत्राने ही होडी किनाऱ्यावर नेणं अवघड झालं असतं. आता लगेच परतणं आवश्यक होतं. ''आज भरती १२ वाजता सुरू झाली... आता संपणार आहे. हे भरती ओहोटीचं शास्त्र चंद्र आणि पृथ्वी यांच्यामधील आकर्षणानुसार ठरते बरं का? रोज भरतीचा वेळ बदलते, ओहोटीची वेळही बदलते. मच्छिमार लोक ही वेळ पाहूनच होड्या समुद्रात लोटतात व परतही आणतात. भरतीच्या वेळी मोठमोठ्या लाटा उसळतात व किनाऱ्याकडे धावतात तर ओहोटीच्या वेळी समुद्राकडे आत शिरतात. भरतीच्या वेळेला किनाऱ्यावरचा वाळूचा भाग लाटांनी आक्रमित होतो तर ओहोटीच्या वेळेस तो उघडा पडतो. समुद्र मागे गेलेला दिसतो. तुम्हांला एक धोक्याची सूचना देऊन ठेवतो. तुम्ही चुकूनही कधी त्या दक्षिणेकडच्या टोकाला पोहायला जाऊ नका बरं. तिथं समुद्राच्या पोटात मोठे खड्डे आहेत. पोहता पोहता अचानक माणसं बुडतात. कारण त्यांना पाण्यात असलेल्या खालच्या खड्ड्यांचा अंदाज येत नाही आणि त्यात ओहोटी असेल तर फारच वाईट. माणूस बुडालाच म्हणून समजा. म्हणून तुम्हांला ही सूचना दिली. लक्षात ठेवा बरं का.''


होडी आता अगदी समुद्र किनाऱ्यावरच येऊन ठेपली. वाळूत अडकण्यापूर्वीच बाबा पटकन् खाली उतरले. होडीतून एक लाकडी ओंडका काढून त्यांनी होडीच्या पुढच्या भागात खाली वाळूत टाकला व त्यावरून घसरण करीत होडी किनाऱ्यावर आणली. नील व बाबूलनेही होडीतून पटापट पाण्यात उड्या मारल्या व होडी पाण्याबाहेर काढायला मदत केली. आजूबाजूचे जवानही मदतीला धावले. एकच गजर झाला. 'सातेरीच्या नावानं चांगभलं...' त्या जोरावरच होडी किनाऱ्यावर सुरक्षित जागी येऊन उभी राहिली. सगळे घराकडे निघाले. भूक लागली होती. बाबा म्हणाले ''नील, तू निवती आणि भोगवेच्या मध्ये असलेल्या डोंगरावरचे सोनेरी खडक पाहिलेस का?'' नाही.


''मग उद्याच बाबूलबरोबर जा...' गोल्डन रॉक्स पाहायला आणि हो त्याआधी निवतीचा किल्ला पाहायला विसरू नको.


संपर्क : ९४२३२९५३२९

## इ. ११ वी च्या विद्यार्थ्यांसाठी 'बालभारतीच्या'
## मराठी व इंग्रजी माध्यमातील दर्जेदार व गुणवत्तापूर्ण स्वाध्यायपुस्तिका















**ठळक वैशिष्ट्ये**

- प्रचलित पाठ्यपुस्तकावर आधारित
- स्वयं अध्ययनास चालना देणारी
- लेखनाचा अधिकाधिक सराव
- प्रश्नप्रकारांमध्ये वैविध्य
- विषयांचे दृढीकरण
- जिज्ञासावर्धक आणि विचारप्रवर्तक प्रश्न
- पाठ्यांशावर आधारित परंतु पाठ्यपुस्तकापलीकडील ज्ञानाच्या वाढीला चालना देणारे प्रश्न
- महाराष्ट्रातील शिक्षण तज्ज्ञ व अनुभवी शिक्षकांचा लेखन सहभाग
- अल्प किंमतीत दर्जेदार व गुणवत्तापूर्ण अभ्यास साहित्य

**नोंदणीकृत विक्रेते व शैक्षणिक संस्थांना २०% सवलत**




**वरील स्वाध्याय पुस्तके खरेदीकरिता मंडळाच्या खालील विभागीय भांडार व्यवस्थापकांशी संपर्क करावा**

**विभागीय भांडारे**

पुणे–९४२३००५०७०, मुंबई (गोरेगाव)– ९४२३००५०७१, छत्रपती संभाजीनगर– ९४२३००५०७३, नागपूर– ९४२३००५०७२, नाशिक–९४२३००५०७४, लातूर– ९४२३००५०७५, कोल्हापूर– ८७९९९०९६५६, अमरावती ९४२३००५०७७, पनवेल– ९४२३००५०७८

अविनाश हळबे

# मराठी - इंग्रजी शब्दकोशाचा जनक : जेम्स थॉमस मोल्सवर्थ

बालमित्रांनो, आपली मराठी भाषा ही एक अत्यंत समृद्ध भाषा आहे. आपल्या भाषेच्या वाटचालीत एक महत्त्वाचे नाव म्हणजे, मराठी - इंग्रजी शब्दकोशाचा (डिक्शनरी) लेखक आणि संपादक जेम्स थॉमस मोल्सवर्थ हे होय. इंग्रजांच्या काळात घडलेली त्या शब्दकोश निर्मितीची सत्यकथा अचंबित करणारी आणि आजच्या तरुणांना प्रेरणा देणारी अशी दोन्हीही आहे. प्रत्येक मराठी माणसाला ती माहीत असायलाच हवी.

वास्तविक जेम्स थॉमस मोल्सवर्थ हा कोणी लेखक अथवा शिक्षण क्षेत्रातील व्यक्ती नसून ब्रिटिश लष्करातील एक अधिकारी होता. त्याचा जन्म १५ जून १७९५ चा. त्याच्या आईचे नाव कॅथेरीन आणि वडलांचे नाव रिचर्ड असे होते. शालेय शिक्षण आणि बालपण ब्रिटनमध्ये गेले. त्या काळी किशोरवयीन ब्रिटिश मुलांना, लष्करात दाखल करण्याची पद्धत होती. त्यामुळे जेम्स वयाच्या सोळाव्या वर्षी दुभाष्या म्हणून ब्रिटिश लष्करात दाखल झाला. ३ एप्रिल १८१२ रोजी सैन्यातल्या एनसाइन या



कनिष्ठ अधिकारी पदावर जेम्स मोल्सवर्थची नेमणूक करून, त्याला भारतात पाठवण्यात आले. १८१२ साली मोल्सवर्थचे वय वर्षे फक्त १७ होते.

ब्रिटिश लष्करी अधिकाऱ्यांना त्या काळी मराठी व हिंदुस्थानी (हिंदी) भाषा सक्तीने शिकाव्या लागत, एवढेच नव्हे तर त्या भाषांच्या परीक्षाही द्याव्या लागत आणि त्यात पास होण्याची सक्तीही असे. त्यानुसार मोल्सवर्थने मराठी व हिंदी या दोन्ही भाषा शिकायला सुरुवात केली. मोल्सवर्थ केवळ मराठी भाषा शिकला नाही, तर त्याने त्यावर प्रभुत्व मिळवले. पुढे तो मराठी भाषेच्या चक्क प्रेमातच पडला. यातून त्याला मराठी शब्द जमवण्याचा छंद लागला. १८१४ मध्ये त्याला लेफ्टनंट म्हणून बढती मिळाली आणि त्याची बदली सोलापूरला झाली. तिथे २३ वर्षांचा हा युवक नोकरी करताकरता समोर आलेले मराठी शब्द आणि त्याचे भाषांतर टिपून ठेवत होता. या शब्दांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली. पुढे १८२४ मध्ये त्याची बदली गुजरातमध्ये खेडा भागात झाली. मराठी वातावरणाची सवय झालेल्या मोल्सवर्थला गुजरातमध्ये करमेना. त्याने काही महिन्यांत ब्रिटिश सेनेकडे मराठी – इंग्रजी शब्दकोश तयार करण्याचा प्रस्ताव पाठवला आणि त्यासाठी महाराष्ट्रात बदलीही मागितली. इंग्रज सरकारला मराठी शब्दकोशाबद्दल काहीही रस नव्हता. त्यांना आपण बरे आणि आपले साम्राज्य बरे एवढेच माहीत होते. मोल्सवर्थच्या प्रस्तावावर ब्रिटिश सेनेने निर्णय दिला की 'लेफ्टनंट कर्नल केनेडी यांनी एक मराठी – इंग्रजी शब्दकोश तयार केला आहे, तो लष्करासाठी पुरेसा आहे. सबब, तुमचा प्रस्ताव नामंजूर करण्यात येत आहे !'

पण मोल्सवर्थ तर मराठी शब्दकोशाच्या कल्पनेने झपाटला होता. स्मरणपत्र पाठवूनही त्याची महाराष्ट्रात बदली होत नव्हती. शेवटी कंटाळून त्याने शब्दकोश तयार करण्याची पुन्हा परवानगी मागून, त्यासाठी बदली झाली नाही तर लष्करी नोकरीच सोडून देईन अशी धमकी दिली! या धमकीचा योग्य परिणाम होऊन त्याची बदली मुंबईत करण्यात झाली. मोल्सवर्थवर अधिकारी म्हणून लष्करी जबाबदाऱ्या होत्या, त्यात आणखी एक भर म्हणजे बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीचा (BNES) कारभार पाहण्याचं कामही त्याला दिलं गेलं. बीएनईएस संस्थेत त्याची भेट मराठी भाषा उत्तम जाणणाऱ्या काही शास्त्री-पंडितांशी झाली. पूर्वी सोलापूरला असताना त्याची ओळख थॉमस कँडी यांच्याशी झाली होती. थॉमस कँडी आणि त्यांचा जुळा भाऊ जॉर्ज दोघेही मराठी उत्तम जाणणारे होते. थॉमस तर संस्कृत पाठशाळेचे प्राचार्य म्हणून काम करीत असत. दोघा कँडी बंधूंना मुंबईला बीएनईएसमध्ये पाठवण्यात यावं, ही मोल्सवर्थची विनंतीही ब्रिटिशांनी मान्य केली.

कँडी बंधू एप्रिल १८२६ मध्ये मुंबईला आले. आता मराठी शब्दकोशाचं काम वेगात सुरू झालं. या कामात त्यांनी काही विद्वानांनाही नोकरीस ठेवून, महाराष्ट्रातल्या निरनिराळ्या भागातले शब्द, वाक्प्रचार, म्हणी, व्याकरण, अन्वय, शब्दार्थ, वाच्यार्थ गुह्यार्थ, लौकिकार्थ, गर्भितार्थ, संदर्भ यांचा सर्व बाजूंनी अभ्यास करून, त्यांना शब्दकोशात स्थान द्यायला सुरुवात केली. पण त्यावर्षी जून महिन्यात मुंबईत पावसाने थैमान घातलं. हवामान एकदम बदलून गेलं. कँडी बंधू आणि मोल्सवर्थ सगळेच त्या पावसाने हैराण होऊन आजारी पडू लागले. यामुळे मुंबई सोडून कोकणात जावं असं त्यांनी ठरवलं. त्यानुसार शब्दकोशाचं पुढलं काम बाणकोट आणि दापोली येथे झालं. १८२८ च्या डिसेंबरात शब्दकोशाची अंतिम प्रत तयार झाली. बीएनईएस संस्थेचा लिथो छापखाना होता. तिथे शब्दकोशाची छपाई करावी असं ठरलं. परंतु मोल्सवर्थला उपलब्ध असलेले मराठी टाईप आवडले नव्हते. त्यामुळे त्याने नवा आणखी सुबक टाईप शब्दकोशासाठी करून घेण्याचे ठरवले. त्या वेळी असे टाईप फक्त कलकत्त्यात तयार

होत. काही आठवड्यांत कलकत्त्याहून नवे टाईपही आले. तयार झालेला शब्दकोश २५,००० शब्दांचा होता. कलकत्त्याहून टाईप यायला जो वेळ लागला तेवढ्या वेळात मोल्सवर्थने आणखी १५,००० शब्द जमा केले आणि शब्दकोशातील शब्दांची संख्या ४०,००० केली! शब्दकोशाला नाव दिले 'महाराष्ट्र भाषेचा कोश'. छपाई पूर्ण होऊन प्रती हाती यायला १८३१ साल उजाडले. मोल्सवर्थने काही प्रती एका पत्रासोबत ब्रिटिश सेनाप्रमुखांकडे पाठवल्या. पूर्वी उल्लेखलेला लेफ्टनंट कर्नल केनेडींनी तयार केलेला मराठी शब्दकोश ८००० शब्दांचा होता. मोल्सवर्थचा ४०,००० शब्दांचा. या शब्दकोशाची पान संख्या ९१९ होती. ज्यांची मातृभाषा मराठी आहे अशांसाठीही तो उपयोगी पडेल एवढा दर्जेदार शब्दकोश होता. भाषा आणि लष्कर हे दोन्ही एका आयुष्यात सामावणारा मोल्सवर्थ शब्दकोशाच्या पहिल्या पानावर इंग्रजीत एक ब्रीदवाक्य आहे. ते असे : '*Language is the armoury of the human mind, and it contains at once the trophies of the past, and the weapons of its future conquests.*' असे असूनही ही गोष्ट मान्य करतील तर ते ब्रिटिश कसले? त्यांनी मान्यता न देता, उलट मोल्सवर्थच्या शब्दकोशाचा दर्जा ठरवण्यासाठी एक समिती नेमली. त्यात लेफ्टनंट कर्नल केनेडी, लेफ्टनंट जॉर्ज पोप, आणि रॉबर्ट कॉटन मनी हे तीन सदस्य नेमले. केनेडींच्या मते मराठी ही फक्त एक बोली भाषा होती, आणि त्यात जे मोजके शब्द आहेत त्यामुळे त्यांनी तयार केलेला शब्दकोश पुरेसा होता. हे कारण पुढे करून त्यांनी नव्या कोशाला कडाडून विरोध केला. त्यांच्या मते मोल्सवर्थने संस्कृत, पर्शियन, फारशी, अरबी वगैरे शब्दांचा आपल्या शब्दकोशात भरणा करून शब्दसंख्या उगीच वाढवली आहे. मराठीत एवढे शब्दच नाहीत. जॉर्ज पोप यांनीही केनेडींचीच री ओढली. पण रॉबर्ट मनी यांनी मात्र मोल्सवर्थचं कौतुक केलं. भारतात आजपर्यंत झालेल्या छपाईत ही छपाई उजवी असल्याचे सांगून त्यांनी लिहिलं की "अशा मोठ्या शब्दकोशाची विद्यार्थ्यांचा विचार करता गरजच होती. हा शब्दकोश समृद्ध आणि अचूक आहे. मऱ्हाठा (मराठी) भाषेचे विशाल ज्ञान त्यात आहे. हा ग्रंथ गौरवास पात्र आहे."

त्रिसदस्य समितीची उलट सुलट मते पाहून इंग्रज सरकार बुचकळ्यात पडले. त्यांनी आता १८ सदस्यांची एक समिती मोल्सवर्थ डिक्शनरीचे मूल्यमापन करण्यासाठी नेमली. त्या समितीने मात्र एकमुखाने मोल्सवर्थच्या कामाची वाखाणणी केली. मोल्सवर्थचा शब्दकोश नसता तर कित्येक मराठी शब्द युरोपियनांना कधीच समजले नसते असा अभिप्राय बहुतेक सदस्यांनी दिला. या मराठी-इंग्रजी शब्दकोशाला मुंबईच्या विल्सन महाविद्यालयाचे संस्थापक आणि मराठी भाषेचे अभ्यासक डॉ. जॉन विल्सन यांनी प्रदीर्घ प्रस्तावना लिहिली होती. ते लिहितात 'मराठीत एकूण (सुमारे) तीन हजार म्हणी आहेत. त्या म्हणी या (मोल्सवर्थ) शब्दकोशात फार मोठ्या प्रमाणावर आल्या आहेत.' शब्दांचे अर्थ देताना मोल्सवर्थने मराठी म्हणींचे आणि वाक्प्रचारांचे अर्थही उत्तम प्रकारे सांगितले आहेत.'

या सर्व सकारात्मक घटनांमुळे सप्टेंबर १८३१ मध्ये इंग्रज सरकारने शब्दाकोशास मान्यता देऊन, मोल्सवर्थची प्रशंसा करणारे पत्र त्याला पाठवले. मोल्सवर्थने आता इंग्रजी – मराठी डिक्शनरीही तयार करावी असंही इंग्रज सरकारने सुचवलं आणि त्या खर्चास मंजुरीही दिली. मोल्सवर्थने कँडी यांच्या मदतीने इंग्रजी – मराठी डिक्शनरीचे काम सुरूही केले. परंतु १८३२ च्या सुमारास त्याची तब्येत बिघडू लागली. जिद्दीने मराठी – इंग्रजी शब्दकोशाचे काम करताना त्याचे तब्येतीकडे दुर्लक्ष झाले होते त्याचा हा परिणाम होता. आयुष्यातली इतकी सारी वर्षे मराठी – इंग्रजी शब्दकोश तयार करण्यात गेली होती. तो आता

३७ वर्षांचा झाला होता. लग्न करायचं राहूनच गेलं होतं. थंड हवेच्या ठिकाणी गेलं तर तब्येत सुधारेल म्हणून तो दक्षिण भारतात उटीजवळच्या भागात काही दिवस जाऊन राहिला. पण तब्येत त्याला साथच देत नव्हती. नाईलाजाने तो १८३६ मध्ये इंग्लंडला परत गेला. तिकडे त्याने आपल्या लष्करातील नोकरीचा राजीनामा देऊन निवृत्तिवेतनावर पाणीही सोडले. इंग्रजी – मराठी डिक्शनरीचे काम शेवटी झालेच नाही.

१८३६ ते १८५१ ही १५ वर्षे मोल्सवर्थ मराठी आणि महाराष्ट्रापासून दूर साता समुद्रापार इंग्लंडमध्ये राहिला. दरम्यान शब्दकोशाची पहिली आवृत्ती संपत आली होती. दुसरी सुधारित आवृत्ती तयार करायची होती. इंग्रज सरकारने १५ वर्षांनंतर मोल्सवर्थला विनंती केली की दुसरी आवृत्ती तयार करायला भारतात या, मराठीसाठी तुमची गरज आहे. त्या विनंतीला मान देऊन मोल्सवर्थ १८५१ साली पुन्हा भारतात आला. वय ५६ वर्षांचे होते. पण तब्येत सुधारली होती. त्याला सर्वांशी उत्साहाने उत्कृष्ट मराठीत बोलताना पाहून लोक तोंडात बोट घालत होते. १८५१ ते १८५७ ही सात वर्षे मोल्सवर्थने मराठी – इंग्रजी शब्दकोशासाठी पुन्हा वाहून घेतले. हे काम त्याने पुणे आणि महाबळेश्वर येथे राहून केले. तयार झालेल्या नव्या सुधारित शब्दकोशात आता ६०,००० मराठी शब्द होते. १८५७ साली हा ९५२ पानांचा सुधारित मोल्सवर्थकृत मराठी इंग्रजी शब्दकोश प्रकाशित झाला. आजही सुमारे १००० पानांचा मोल्सवर्थचा हा शब्दकोश मराठीतला सर्वांत मोठा शब्दकोश आहे. महाराष्ट्रातल्या न्यायालयात जेव्हा एखाद्या मराठी शब्दाचा अर्थ लावण्याची वेळ येते, तेव्हा मोल्सवर्थने दिलेला अर्थ न्यायाधीश प्रमाण मानतात. अमेरिकेच्या शिकागो युनिव्हर्सिटीने ही डिक्शनरी इंटरनेटवर (सर्चसह) उपलब्ध केली आहे.

काम संपल्यावर मोल्सवर्थ १८६० मध्ये इंग्लंडला परत गेला. तिथे त्याने स्वतःला अनेक आध्यात्मिक कार्यांना वाहून घेतले. १३ जुलै १८७२ रोजी क्लिफ्टन येथे वयाच्या ७७ व्या वर्षी त्याचे निधन झाले. भारतात शब्दकोशाच्या कामात मोल्सवर्थला मदत करणारी कितीतरी मंडळी होती. ते सारे मोल्सवर्थला मोलेसर शास्त्री म्हणत. काही जणांनी तर त्याचे मोरेश्वर शास्त्री असेच बारसे करून टाकले होते.

जेम्स थॉमस मोल्सवर्थ, ज्याची मातृभाषा इंग्रजी होती, ज्याचा मराठीशी काहीही संबंध नव्हता, असा एक ब्रिटिश लष्करातील अधिकारी मराठीच्या प्रेमात पडतो काय, त्यासाठी आयुष्य वाहून टाकून शेवटपर्यंत अविवाहित राहतो काय, आणि कोण कुठले परके ब्रिटिश त्याच्याकडून १८५७ साली आपल्याला पुढे आयुष्यभर पुरेल असा सुधारित शब्दकोश तयार करून घेतात काय, सगळेच अघटित आहे. आपली मातृभूमी इंग्लंड सोडून सातासमुद्रापलीकडे भारतात, तेही लष्करातल्या नोकरीत आलेल्या १७ वर्षाच्या युवकाने १८१२ पासून पुढे वयाच्या ७७ व्या वर्षी मृत्यूला सामोरे जाईपर्यंत मराठीचा अभ्यास सोडला नाही. ७७ वर्षाच्या आयुष्यातली ६० वर्षे मराठीचा ध्यास घेतलेला हा ब्रिटिश माणूस शेवटपर्यंत अविवाहित होता. आज मोल्सवर्थइतकं समर्पण मिळण्याची अपेक्षा नाही, पण निदान त्याच्याकडून प्रेरणा घेण्याइतपत तरी क्षमता आजच्या मराठीजनांमध्ये असायला हवी.

मोल्सवर्थच्या कार्याचा गौरव करताना मराठी विश्वकोशकर्ते पंडित लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी लिहीले, “मोल्सवर्थने मोठ्या आकाराचा पहिला मराठी शब्दकोश तयार केला. त्याने त्याच्या या शब्दकोशाच्या प्रचंड कामासाठी कितीतरी विद्वानांना प्रेरित केले आणि त्या कामात सहभागी करून घेतले. स्वतः मोल्सवर्थनेही या शब्दकोशासाठी आपले संपूर्ण आयुष्य वाहिले. मराठी भाषा आणि महाराष्ट्र, मोल्सवर्थचे हे ऋण कधीच विसरू शकणार नाही !”


**संपर्क– ९०११०६८४७२**

# चला चित्र रंगवूया...!!!

रेश्मा बर्वे

**गावातल्या मुलांनी एकत्र येऊन आपली शाळा आणि परिसर स्वच्छ करायला घेतला. स्वच्छता करताना त्यांनी कोणकोणत्या गोष्टी वापरल्या असतील याचा विचार करून चित्र पूर्ण करा आणि छानसे रंगवा.**





अच्युत गोडबोले

# AI आणि चित्रपट उद्योग

*(फोटो सौजन्य : https://commons.wikimedia.org)*

२०१५ मध्ये 'दि आयरिश मॅन' नावाच्या चित्रपटाच्या निर्मितीला सुरुवात झाली. या चित्रपटात अल पचिनो, रॉबर्ट दि नीरो यांसारखे दिग्गज कलाकार काम करणार होते. एक अडचण होती, या दिग्गज कलाकारांचं प्रत्यक्षात वय झालं होतं. पण, चित्रपटातल्या त्यांच्या भूमिका तरुणपणापासून ते वृद्धत्वापर्यंत प्रवास करणाऱ्या होत्या. त्या वेळच्या पद्धतीप्रमाणे चेहऱ्यावर मार्कर बसवून चित्रीकरण करणं आणि नंतर व्हिडिओ एडिट करणं हा एक पर्याय होता. पण चेहऱ्यावर मार्कर बसवल्यानंतर अभिनेत्यांना आपल्या चेहऱ्यावर नैसर्गिक हावभाव आणणं कठीण होऊन बसतं. त्यामुळे चित्रपट निर्मात्याला हा पर्याय पसंत नव्हता.

मग या चित्रपटातले प्रसंग चेहऱ्यावरच्या मार्कर्सशिवायच शूट करण्यात आले. नंतर या दृश्यात व्हिज्युअल इफेक्ट्स आणायचे असल्यानं हे शूटिंग तीन वेगवेगळ्या अँगल्समधून करण्यात आलं. 'फ्लक्स' नावाचं सॉफ्टवेअर वापरून या चित्रीकरणातल्या अभिनेत्यांना चक्क ४०-५० वर्षांनी तरुण करण्यात आलं! या अभिनेत्यांच्या तरुणपणीच्या अनेक चित्रपटांचा अभ्यास 'फ्लक्स' सॉफ्टवेअरनं केला होता. चित्रीकरणात असे अचाट बदल करण्यासाठी 'फ्लक्स' सॉफ्टवेअर AI तंत्रज्ञान वापरतं !

इतर क्षेत्रांप्रमाणेच फिल्म इंडस्ट्रीमध्येही AI तंत्रज्ञानानं धुमाकूळ घालायला सुरुवात केली आहे! अलीकडच्या काळात पटकथा लिहून झाली की लगेचच चित्रपट निर्माते AI तंत्रज्ञानाचा वापर करताना दिसत आहेत. 'स्क्रिप्टबुक' सारखी सॉफ्टवेअर्स पटकथा पाहून तो चित्रपट बॉक्स ऑफिसवर चालेल की नाही, त्यातल्या कथानकात काही बदल करायला हवा का, किंवा पटकथेतल्या पात्रांमध्ये काही बदल करायला हवा का अशा गोष्टींवर महत्वाचे सल्ले देतात. ही सॉफ्टवेअर्स अर्थातच AI तंत्रज्ञानाचा वापर करतात. पूर्वी होऊन गेलेले चित्रपट, त्यांचं बॉक्स ऑफिसवरचं यशापयश याच्या माहितीचा ते वापर करतात ! 'ट्वेन्टीएथ सेंच्युरी

फॉक्स'च्या 'लोगन' या चित्रपटाच्या कथानकात आणि पात्रांमध्ये AI सॉफ्टवेअरच्या अशाच प्रकारच्या सूचनांवरून काही बदल करण्यात आले होते.

चित्रपटाचं चित्रीकरण सुरू होण्याआधीच त्यात अभिनय करणाऱ्या कलाकार मंडळींची नावं AI सॉफ्टवेअरला दिली तर ते सॉफ्टवेअर या क्षणी त्या मंडळींचं बाजारात काय स्थान आहे याचा शोध घेतं. मग त्या कलाकारांना घेऊन तो चित्रपट बॉक्स ऑफिसवर चालेल की नाही हेही AI सॉफ्टवेअर सांगतं! चित्रपटातली वेगवेगळी दृश्यं चित्रित करण्यासाठी योग्य अशी ठिकाणं निवडणं ही गोष्टदेखील बऱ्यापैकी वेळखाऊ असते. पण आजच्या जमान्यात AI सॉफ्टवेअर हजारो तासांचे वेगवेगळ्या ठिकाणांचे शूटिंग असणारे व्हिडीओज् पटकन पाहत चित्रीकरणासाठी योग्य असणारी ठिकाणं सुचवतं!

चित्रीकरण चालू असताना कलाकार मंडळी अभिनय करतात आणि दिग्दर्शकाला त्यांचा अभिनय पसंत पडला नाही तर तो पुन्हा पुन्हा 'रीटेक' घेतो. ही गोष्ट अगदी सामान्य आहे. पण आता 'फेसडायरेक्टर' सारखी AI तंत्रज्ञानावर आधारित सॉफ्टवेअर्स यात बदल घडवू शकतात. या सॉफ्टवेअरच्या साहाय्यानं चित्रीकरण झालेल्या दृश्यांमधल्या अभिनेत्यांच्या चेहऱ्यावरचे हावभावही आपल्याला हवे तसे बदलता येतात! म्हणजे पुन्हा पुन्हा रीटेक घेण्याचीही गरज भविष्यात उरणार नाही! इतकंच काय, AI वर आधारित असणारं डीप फेक तंत्रज्ञान वापरून चित्रीकरण झालेल्या दृश्यांमध्ये चक्क अभिनेत्यांचे चेहरेच बदलता येतात! उदाहरणार्थ अॅब्राहम लिंकन हा हीरो आणि मधुबाला ही हीरॉइन असलेला चित्रपटही आपण आपल्या कॉम्प्युटरवर बनवू शकतो. एवढंच काय, काही वर्षांनी अभिनेत्यांची गरजही कदाचित लागणार नाही. त्यांचेच जुने फोटोज/व्हिडीओज घेऊन, ते अॅनिमेट करून, त्यात संवाद घालून चित्रपट बनवता येतील. त्यासाठी करार आणि पैसे कसे असतील कोण जाणे !

चित्रीकरण पूर्ण झाल्यानंतर चित्रपटाचं एडिटिंग करणं




हीदेखील एक किचकट गोष्ट असते. बऱ्याचदा चित्रीकरण होताना दिसणाऱ्या वस्तू नंतर पडद्यावर चित्रपट पाहताना नकोशा वाटतात. चित्रफितीतून अशा गोष्टी काढायच्या कशा? इथेही AI सॉफ्टवेअर आपलं अवघड काम सोपं करतं. 'सेन्सेई' सारख्या AI तंत्रज्ञानावर आधारित सॉफ्टवेअर्स चित्रफितीमधून आपल्याला नको असणाऱ्या वस्तू काढून टाकायला मदत करतात ! एडिटिंग करताना चित्रपटात आपल्याला हवे तसे साउंड इफेक्ट्स टाकणंही AI मुळे आजकाल सोपं झालंय.

शेवटी चित्रपटाचं मार्केटिंग करण्यासाठीही AI मदतीला येतं. AI सॉफ्टवेअर सगळीकडे सोशल मिडियावर काय चालू आहे याचा अभ्यास करत सध्याचे ट्रेंड्स शोधतं! सध्याचे ट्रेंड्स समजल्यावर चित्रपटाची मार्केटिंग स्ट्रॅटेजी काय असायला हवी याविषयीही ते सल्ला देतं ! आयबीएमच्या 'वॉटसन'सारखं AI वर आधारित सॉफ्टवेअर वापरून चित्रपटाचे ट्रेलर्सही बनवता येतात! भविष्यात AI मुळे चित्रपटक्षेत्रात काय काय बदल होतील याचं भाकीत करणंही आता कठीण झालंय!

**संपर्क :** achyut.godbole@gmail.com



मल्हार अरणकल्ले

# सोहळ्याचा दिवस




बदलीच्या गावी जाण्यासाठी गुरुजी दुपारच्या एसटीनं निघाले. घाटातले वळणावळणाचे, खडबडीत रस्ते पार करत गावात एसटी पोहोचायला चांगलाच काळोख झाला. तो भाग गुरुजींना नवा होता. त्यांनी कंडक्टरला आधीच सांगून ठेवलं होतं ''गाव आलं की मला आवाज द्या.''

कंडक्टरनं ते लक्षात ठेवलं होतं.

एका फाट्यावर गाडी आली, तसा कंडक्टरने गुरुजींना आवाज दिला. म्हणाला, ''मास्तर, घ्या इथं उतरून.''

शबनम पिशवी गळ्यात अडकवून गुरुजी गाडीतून उतरले. गाव काळोखात बुडालं होतं. डोळ्यांत बोट घातलं तरी दिसणार नाही, एवढा अंधार पसरलेला होता. पायाखालचा रस्ता म्हणजे काळोखाची नदीच झालेला होता. त्याला रस्ता म्हणायचं तरी कसं?

कारण पायांखाली खाचखळगे आणि दगडगोटे. गुरुजी अंधारातून कसेबसे चालत राहिले. चौकशी करायला बाहेर कुणी माणूसकाणूस होतंच कुठं? गुरुजींना दूरवर दिव्याच्या फिकट पिवळसर रेषा दिसत होत्या. तिथं कुणीतरी नक्की असेल, त्यांच्याकडे विचारपूस करू, असा विचार करून गुरुजी त्या दिशेनं निघाले.

काही वेळानं ते तिथं पोहोचले. एकमेकींना खेटून असलेल्या पाच-सात झोपड्यांची ती छोटी वस्ती होती. सगळ्या झोपड्या कुडाच्या. बुटक्याबसक्या. रांगेतल्या पहिल्या झोपडीच्या दारावर गुरुजींना थाप दिली. कुरकुरत्या आवाजापाठोपाठ कुडाचं दार बाजूला झालं. पन्नाशीचे एक जण आतून डोकावले.

त्यांनी संशयी नजरेनं विचारलं, ''पाव्हनं, कोन गाव म्हनायचं?''

''आमी तिकडचं, लांबचं. पुण्याच्या साइटकडचं.'' – त्यांना समजेल अशा शब्दांत गुरुजींनी उत्तर दिलं.

आतून आवाज का ''आलं हिकडं? कुटं जायाचं?''

''साळंत. मास्तर हाय साळंचा.''

''असं म्हना की. मास्तर हायसा!''

''व्हय जी.''

''पन मास्तर, हितं साळाच न्हाय. पोरं बी न्हाईत.''

ती आदिवासी भागातली छोटी वस्ती होती. तिथं शाळा होती; पण फक्त कागदपत्रातली. पटसंख्या : सतरा. उपस्थिती : शून्य. शाळेची जागा : मारुतीचं देऊळ.

तिथल्या कामाचं स्वरूप गुरुजींच्या लक्षात आलं.

गुरुजींनी ती रात्र त्याच झोपडीत काढली.

उजाडल्यावर त्यांना वस्तीचं दर्शन झालं.

गुरुजी मारुतीच्या देवळात गेले. तिथं शाळेची काहीच खूण नव्हती. सुरुवात शून्यापासून करावी लागणार होती.

गुरुजींनी त्या वस्तीतच स्वतःसाठी झोपडी उभारली. आता त्यांना शाळेसाठी विद्यार्थी तयार करायचे होते. त्यांच्या आधी आलेले शिक्षक कंटाळून बदली करून घेऊन दुसरीकडे गेले होते.

वस्तीतली सगळी माणसं शेतमजुरीला जायची. बरोबर पोरंही न्यायची. वयस्क माणसांशिवाय वस्तीत दिवसभर कुणीच नसे. संध्याकाळी वस्तीत गजबज होई. तीन दगडांच्या चुलींत जाळ पेट घेई. लाल निखारे फुलून येत. गरम भाकऱ्यांचे आणि कालवणाचे खरपूस वास वस्तीत भरून राहत. झोपड्यांत रॉकेलच्या दिव्यांचा मिणमिणता उजेड असे.

संध्याकाळी गुरुजी एकेका झोपडीत जायचे. लोकांशी बोलायचे. 'मुलांना शाळेत पाठवा' असं सांगायचे. तिथलं कुणी शिकलेलं नव्हतं. त्यांना गुरुजींचं सांगणं कळत नसे. गुरुजींनी प्रयत्न सोडले नाहीत. ते लोकांना सांगत राहिले. शाळेसाठी कशीबशी चार-पाच मुलं मिळाली.

मारुतीच्या देवळात गुरुजींची शाळा सुरू झाली. गाणी, गोष्टी आणि चित्रं. शिकवण्यासाठी गुरुजी एवढंच वापरत. ही गाणी पानाफुलांची होती. गोष्टी पशुपक्ष्यांच्या होत्या. ते मुलांच्या रोजच्या जगण्यातलं होतं. मुलांना ते आवडू लागले. मुलांचे आणखी सवंगडी शाळेत येऊ लागले.

मारुतीचं देऊळ सगळ्यांसाठी कमी पडू लागलं. संध्याकाळच्या बोलण्यात गुरुजींनी एकदा विषय काढला : मुलांसाठी आपण शाळा उभी करू. सगळ्यांनी होकार दिला. शाळेसाठी स्वतः काम करायची तयारी त्यांनी केली. तिथलीच एक जागा त्यांनी साफ केली. चांगल्या मेढी रोवल्या. (मेढ म्हणजे खांबासारखी वापरली जाणारी झाडाची लाकडं. अनेकवचन : मेढी) उभे-आडवे वासे टाकले. वर गवत, पालापाचोळा अंथरला. तो घट्ट बांधून टाकला. कुडाच्या भिंती उभ्या केल्या. शाळा तयार झाली.

मुलांना शिकायची गोडी लागली. गुरुजींचं नवखेपण केव्हाच संपलं. ते वाडीचेच झाले.

गुरुजी एकदा म्हणाले, ''वाडीत तुमची शेतं

आहेत; पण तुम्ही दुसऱ्यांच्या शेतात मजुरी करता. ही शेतं आपणच पिकवू की.

लोक म्हणाले, ''गुरुजी, ह्या वाडीत पान्याचा थेंब न्हाई. कसली शेती करता?''

गुरुजी म्हणाले, ''मी सोय करतो पाण्याची. ते लांब धरण आहे, तिथून पाईप टाकून पाणी आणू. पायपांसाठी खोदाई करायचं काम तुमचं. कसं?''

एकदम लोकांचा गलका झाला. मग त्यांनी तयारी दाखवली.

तालुक्याच्या गावाला जाऊन गुरुजी पाईप घेऊन आले. कुदळ-फावडी घेऊन लोक कामाला लागले. दिवस उगवू- मावळू लागले. एक दिवस उजाडला तो काम पूर्ण करूनच.

वाडीपर्यंत पाईप आले. पाण्यासाठी त्यांनी तिथं एक मोठा हौद केला. एके दिवशी वाडीत पाणी आलं. लोक आनंदानं भिजून गेले.

गुरुजी म्हणाले, ''आता आपण शेतं पिकवू.''

शेतांच्या नांगरटी झाल्या. पेरण्या झाल्या. ज्वारी, कांदा, टोमॅटो, मिरची...सगळी पिकं जोमदार आली.

गुरुजी म्हणाले, ''आता ही पिकं तालुक्याच्या बाजारात विकू.''

पिकांचे चांगले पैसे झाले.

गुरुजींबरोबर संध्याकाळी सगळे एका घोंगडीवर बसले. गुरुजी म्हणाले, ''हा तुमच्या घामाचा पैसा आला. सारखे वाटे करून तो सगळ्यांनी घ्या.''

एक जण म्हणाले,''थमा जरा. ह्याच्यावर आदिकार गुरुजींचा हाय. त्येंनी सोताची जिमीन गहानवट टाकली न् बँकेतनं कर्ज घ्येतलं. कुनासाटी? आपल्यासाटी.''

सगळ्यांना आश्चर्य वाटलं. हे कुणाला माहीतच नव्हतं. ते म्हणाले,''गुरुजी ह्यातनं ब्यांकेचं भागवून टाका. ह्यो पैसा आमी घ्येनार नाय.''

गुरुजींनी परोपरीनं सांगितलं, ''त्याची घाई नाही. ही तुमची पहिली लक्ष्मी आहे. ती तुम्हीच घ्या.''

लोकांनी गुरुजींना ठाम नकार दिला. गुरुजींचा मग नाइलाज झाला.

ते बँकेत गेले. कर्ज चुकतं केलं.

ही बातमी बँकेच्या अध्यक्षांना समजली. त्यांनी ती राज्यपालांना कळवली. राज्यपालांना वाटलं, आपण या गुरुजींचं कौतुक तिथं जाऊनच करायला हवं. राज्यपालांची त्या वाडीची भेट निश्चित झाली.

जिल्हाधिकाऱ्यांकडे तशी सूचना आली. आधी पाहणी करण्यासाठी जिल्हाधिकारी वाडीकडे निघाले. तिथं जायला नीट रस्ताच नव्हता. राज्यपालांसाठी रस्त्याचं काम तातडीनं पूर्ण करण्यात आलं.

ठरलेल्या दिवशी राज्यपाल वाडीत आले. त्यांच्याबरोबर मुख्यमंत्री आले. इतर अधिकारी आले. सर्वांनी गुरुजींचं, वाडीतल्या लोकांचं कौतुक केलं.

सरकारतर्फे शाळेसाठी नवी इमारत बांधून द्यायचं मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलं.

गुरुजींची शाळा पहिल्यासारखी सुरू झाली. लोक आपापल्या शेतांत मशागत करू लागले.

एके दिवशी गुरुजींपर्यंत जिल्हाधिकाऱ्यांचा निरोप आला : गुरुजींना राष्ट्रपतींचा विशेष पुरस्कार जाहीर झाला आहे.

वाडीत पताका फडकल्या, आनंदाचे ढोल वाजले.

पुरस्कार घ्यायला गुरुजी दिल्लीला गेले. बरोबर शाळेतली चार मुलं आणि वाडीतली चार-पाच माणसं घेतली. गुरुजींनी एकट्यानं पुरस्कार स्वीकारला नाही. तो या सगळ्यांच्या हातांत देण्याची विनंती राष्ट्रपतींना केली. एरवीचे राजशिष्टाचार, संकेत बाजूला ठेवून त्यांनीही ती मान्य केली.

राष्ट्रपती म्हणाले, ''शिक्षणाच्या क्षेत्रात आजचा दिवस सोन्याचा ठरला आहे. ही माणसं सोन्यासारखी आहेत. आपल्या देशाचं हेच वैभव आहे.''

नंतर कितीतरी वेळ सभागृहात टाळ्यांची संततधार बरसत राहिली. आनंद आणि अभिमान उधळत राहिली.

**संपर्क :** ९८८१०९९००७

# काहीतरी

■ अमित बाविस्कर

चिवडा नको, लाडू नको
काहीतरी हवे...
भूक लागली खाण्यासाठी
काहीतरी हवे...

डब्बा शोधला, बरणी शोधली
झाकण उलटे केले
भूक लागता आई समोर
घर सारे शोधले....

कुठे होती शेव पापडी
कुठेतरी काजू
हवे नव्हते सारे होते
पण काहीतरी कसे शोधू?

सगळे खाऊ डब्ब्यांमध्ये
गप्प कसे होते
माझी नजर पडता मात्र
नाक मुरडत होते...

आई म्हटली,
काहीतरी म्हणजे नक्की काय हवे?
नाव तरी सांग बाळा
जे तुला हवे..

मी म्हटलं आईला,
काहीतरी हवे
नाव मात्र माहीत नाही
ओळखा पाहू बरे...

संपर्क : ९५२७३०९९०५



डॉ. नीलिमा गुंडी

# काठी अक्षरांसाठी

किमया कविता म्हणत होती. ''हाती काठी मी घेतो'' ही ती कविता! त्यात काठी हातात घेऊन वेगवेगळे खेळ खेळणाऱ्या मुलाचे वर्णन आहे. कधी तो मुलगा काठीचा घोडा करतो. कधी शिपाईदादा बनून काठीची बंदूक करतो वगैरे! आईने सांगितलेला अभ्यास तिने पूर्ण केला होता. आई तिची वही तपासायला आली आणि एकदम रागावली.

''किमया, तू हे काय लिहिलं आहेस? कसं वाचायचं हे अक्षर? 'म' ला दोन काने दिले आहेस 'मामा' हा शब्द लिहिताना. 'पूर' लिहिताना 'प' ला काना देऊन उकार काढला आहेस ग! दुसरा उकार देताना काना द्यावा नाही लागत...!''

''अगं आई, पहिली आणि दुसरी वेलांटी असते, पहिला आणि दुसरा उकार असतो; तसा पहिला आणि दुसरा काना पण असणार ना?'' किमयाने सहज तिचे मन मोकळे केले!

''माझी बाळ! कसं सांगू तुला! हे बघ 'काना' म्हणजे जणू अक्षरांसाठी आधाराची काठी असते. मात्र ती अक्षराच्या उंची एवढी असते हं!एकदा काना दिला की मग त्यावर वेलांटी देता येते. काना दिला की अक्षर बाराखडीसाठी तयार होते. त्यापासून नवनवे शब्द घडवता येतात. मात्र पहिला काना आणि दुसरा काना असा प्रकार नसतो. पहिली वेलांटी देण्यासाठी अक्षराच्या आधी रेष मारावी लागते. पण वर वेलांटीचे चिन्ह न देता नुसतीच अक्षराच्या आधी रेष मारलीस, तर ते अक्षर वाचता येणार नाही. तसे चिन्ह रूढच नाही बरं!'' आईने तिला बारकाईने समजावले.

''आई, हं, आता आलं माझ्या लक्षात! आपण 'म', आणि 'न' ही अक्षरे घेतली की काना लावून



मग पुढे आणखी वेलांटी द्यायची ही सोय होते. मग भराभरा शब्द तयार होतात. बघ हं... मान, नाम, मीना, निमा बरोबर ना?'' ''अगदी बरोबर! ''म्हणत आईने किमयाला शाबासकीच दिली. मग म्हणाली ''अक्षरावर 'ओ, औ' च्या मात्रा देतानाही अक्षराला काना लागतो. जसं की कोन, गोण, नौका, औत, दौत कळलं? किमयाने होकारार्थी मान हलवली आणि ती म्हणाली, ''अगं आई, 'कॉट' 'बॉल' लिहितानाही काना लागतो की!'' तेवढ्यात अंगणात बसलेले आबा काठीचा आधार घेत आत आले नि म्हणाले, ''किमया, मी तुला आता काही शब्द लिहायला घालतो! लिही, सारसबाग, राजाराणी, पारनाका आडवातिडवा'' ''पुरे! पुरे!'' असं म्हणत किमया लिहू लागली.

तिचे लेखन पूर्ण झाल्यावर आबांनी हातात वही घेतील. ते हसू लागले. ते म्हणाले, ''किमया, तू बोलण्यात हुशार आहेस; पण लेखनात तुला खूप सराव करायला हवा हं! तू 'सारसाबाग' लिहिलं आहेस. एका 'स' ला काना दिला म्हणजे दुसऱ्या 'स' लाही काना द्यायचा, असं का तुला वाटलं? 'राजाराणी' शब्द बरोबर लिहिला आहेस. पण 'पारा नाका' असा चुकीचा शब्द लिहिला आहेस. आणि 'आडवातिडवा' शब्द लिहिताना 'अ' आणि त्याचा काना यात किती अंतर ठेवलं आहेस! त्या 'अ' ला आडवं होऊन झोपायला जागा ठेवली आहेस का? हे बघ, ही काठी नेहमी माझ्याजवळ असते! तसाच




काना अक्षराच्या जवळ हवा! आपल्या अंगणात उद्या छप्पर घालायचं असेल तर रस्त्यावर खांब रोवून चालेल का? तसंच वेलांटी देण्यासाठी काना म्हणजे खांब रोवलेला असतो. तो जवळच हवा! पहिली वेलांटी देताना काना अक्षराआधी हवा नि दुसरी वेलांटी देताना तो अक्षराच्या पुढे हवा!''

किमया कान देऊन ऐकत होती. मग आई तिला म्हणाली, ''हं! आता लिही काना, मात्रा, वेलांटी, उकार असलेले शब्द – पाट, पेरू, पैसे, पिपाणी, पुटपुटणे. आधी स्वतः तपास हं!'' किमयाने शब्द लिहिले काही तरी चूक तिच्या लक्षात आली. 'कसं चुकलं' असं पुटपुटत तिने ती चूक स्वतःच दुरुस्त केली आणि आईची शाबासकी मिळवली. मग खूश होऊन ती म्हणाली, ''आई, 'काना' या शब्दातही दोन्ही अक्षरांना काना आहे गं! मला तुझी काठीची कल्पनाही खूप आवडली. आता राहील माझ्या लक्षात.'' असं म्हणत ती गिरकी घेत खेळायला गेली सुद्धा.

**संपर्क : ०२०–२४४८६०१५**

'किशोर' हे मासिक मालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती यांचेकरिता, मुद्रक व प्रकाशक विवेक उत्तम गोसावी यांनी मे. प्रिंटप्लस प्रा. लि., गाळा नंबर १ ते १०, ई–१, जय जलाराम इंडस्ट्रीयल कॉम्प्लेक्स, व्हिलेज पिंपलास, ता. भिवंडी, जि. ठाणे ४२१३११. येथे छापून 'बालभारती', सेनापती बापट रोड, पुणे ४११००४ येथे प्रसिद्ध केले. * संपादक – कृष्णकुमार पाटील.

'Kishor' monthly publication is owned by Bureau of Text Book Production and Curriculum Research, Balbharati, Printed and Published by Vivek Uttam Gosavi, Printed at M/s. Printplus Private Limited., G-1 to G-10, E-1, Jai Jalaram Industrial Complex, Village Pimplas, Taluka Bhiwandi, Dist-Thane 421311. and Published at Balbharati, Senapati Bapat Road, Pune-411004. * Editor - Krishnakumar Patil

विजय पाडळकर

# झोपलेली बाग



रात्र झाली. आई आणि बाबा देवला 'गुड नाइट' करून त्यांच्या खोलीत गेले. देव आपल्या पलंगावर निजला पण, आज त्याला झोपच येईना. पडल्या पडल्या इकडून तिकडे, तिकडून इकडे अशी त्याने बरीच वळवळ केली. पण झोप काही येईना. तो कंटाळून पलंगावरून खाली उतरला. खिडकीच्या काचेतून त्याने बाहेर पाहिले. बाहेर थोडा अंधार होता. थोडा उजेड होता. त्याने खिडकी उघडली. त्याला आकाशात त्याचा आवडता चंदामामा दिसला. पण तोदेखील गडबडीने कुठेतरी जात होता.

देव म्हणाला, "चंदामामा चंदामामा, तू कुठे निघालास?"

चंदामामा म्हणाला, "मी घरी चाललो."

"थांब ना! माझ्याशी खेळ ना!"

चंदामामा म्हणाला, "नको बाबा, माझ्या आईने मला लवकर यायला सांगितले आहे. ती रागावेल ना!"



चंदामामा निघून गेला. आता काय करावे? तेवढ्यात देवला खिडकीतून खाली जाणाऱ्या पायऱ्या दिसल्या. देवला आश्चर्य वाटले. या पायऱ्या येथे अचानक कशा आल्या बरे? काल तर त्या नव्हत्या! काल काय, त्याने कधीच त्या पाहिल्या नव्हत्या. पण आता पायऱ्या दिसल्याच आहेत तर त्यांच्यावरून उतरावे असा त्याने विचार केला. नाहीतरी पायऱ्या उतरण्यासाठीच असतात ना! शिवाय पायरीवरून उतरायला देवला फार आवडते. मात्र उतरताना कुणी आपला हात धरू नये असेही त्याला वाटते. माडीवरून खाली येताना बाबा नेहमी देवचा हात धरून ठेवू पाहतात. देव म्हणतो, "मी, मी उतरतो."

आणि आपला हात सोडवून घ्यायला पाहतो.

देवने खिडकीतून बाहेर येत पायरीवर पाय ठेवला.

देवला दिसले, बाहेरचा अंधार कमी झाला आहे. तो एक एक पायरी उतरत गेला आणि बाहेरचा अंधार आणखी कमी होत गेला. शेवटच्या पायरीवर गेल्यावर देवला दिसले की आपल्याला सगळे छान दिसत आहे. पण भोवतीच्या प्रकाशात एक गंमत होती. तो नेहमीसारखा पांढरा नव्हता तर फिकट निळा निळा होता. त्याने निरखून पाहिले तेव्हा त्याला दिसले की आपण आपल्या आवडत्या बागेत आलो आहोत. ही बाग तर त्याच्या चांगलीच ओळखीची होती.

देवने पाहिले, बाग जरी नेहमीची ओळखीची होती तरी आज वेगळी वाटत होती. का बरे? बागेत सारे चिडीचूप होते. कसलाही आवाज नव्हता. त्याला त्याच्या ओळखीचे गुलाबाचे झाड दिसले. त्याच्यावरची फुले झोपली होती. कळ्या झोपलेल्या होत्या. आईने सांगितलेले देवला आठवले. आई म्हणाली होती, "रात्री कळ्या झोपतात."

पण देवला काही ते आवडले नाही. त्याला वाटले, मी खेळायला आलो आहे आणि कळ्या झोप काढतात हे बरोबर नाही. तो एका कळीला म्हणाला, "कळीबाई कळीबाई ऊठ. झोपलीस काय? मी तुला भेटायला आलो आहे."

कळी एक डोळा उघडत म्हणाली, "नको. मला झोपू दे. सकाळी पुन्हा मुले येतात, दंगा करतात, मला झोपू देत नाहीत."

इतके बोलून, डोळा बंद करून कळी झोपी गेलीसुद्धा. देव म्हणाला, "ऊठ ना कळीबाई. असे काय करतेस?"

पण तो कळीला उठवतोय हे झाडाला आवडले नाही. मग गुलाबाचे झाड रागावून त्याला म्हणाले, "देव, माझ्या मुलीची ही झोपायची वेळ आहे. तिला झोपू दे बरे!" देवला वाटले, 'बाप रे, हे झाड जास्त रागावले तर त्याचे काटे आपल्याला टोचेल की काय?' तो नाइलाजाने पुढे गेला.

पुढे गेल्यावर देवला एक लहानसे झाड दिसले. त्याच्यावर चिऊमावशीचे घरटे होते. त्या घरट्यात ती आणि तिचे पिल्लू झोपले होते. देव त्याला म्हणाला, "पिल्ला पिल्ला, ऊठ. झोपलास काय? मी तुला भेटायला आलो आहे."

पिल्लू गाढ झोपले होते. ते उठले नाही. देव पुन्हा म्हणाला, "पिल्ला पिल्ला, ऊठ. झोपलास काय? मी तुझ्याशी खेळायला आलो आहे."

तरी पिल्लू झोपलेलेच. मात्र आता पिल्लाच्या आईला जाग आली. ती उठून म्हणाली,

"कोण आहे?"

"मी देव."

"काय काम आहे?"

"चिऊमावशी, मी तुझ्या पिल्लाशी खेळायला आलो आहे."

चिऊमावशी म्हणाली, "ते आता झोपले आहे. त्याला बिलकूल उठवू नको. कारण उठले की ते भूक लागली म्हणून रडू लागेल. मग त्याच्यासाठी खाऊ शोधायला मला जावे लागेल. या वेळी मला खाऊ कोठून मिळणार? शिवाय आज मी खूप थकले आहे. मलाही आता थोडा वेळ झोपायचे आहे."

असे म्हणून तिने अंगावर कापसाचे पांघरूण ओढून घेतले.

देव मुकाट्याने पुढे गेला.

थोडे पलीकडे गेल्यावर देवला बागेतले कारंजे दिसले. ते छान रंगीत दगडांचे केले होते. या कारंजातून नेहमी पाणी उंच उंच उडत असते हे देवने पाहिले होते. त्याला ते फार आवडते. पण आज कारंजे बंद होते. देवला माहीत होते, कारंज्याच्या खालच्या बाजूला एक बटण असते. ते दाबले की पाणी उंच उडायला सुरुवात होते. त्याने ते बटण शोधले आणि दाबले. पण पाणी काही उडेना. मग तो पाण्याला म्हणाला, "पाण्या पाण्या, ऊठ. झोपलास काय? मी तुला भेटायला आलो आहे."

पाणी काही उठेना. उंच उड्या मारेना.

देव पुन्हा एकदा म्हणाला,



"पाण्या पाण्या, ऊठ. झोपलास काय? मी तुझ्याशी खेळायला आलो आहे."

पाणी काही उठेना. उंच उड्या मारेना.

तेवढ्यात कारंजे म्हणाले, "कोण आहे?"

देव म्हणाला, "मी देव."

"देव, पाण्याला उठवू नको. दिवसभर खालीवर, वरखाली उड्या मारून ते थकले आहे. त्याला झोपू दे. सकाळी माळीदादा येऊन त्याला उठवील तेव्हा त्याला उठावेच लागेल."

देव मुकाट्याने पुढे गेला.

थोडे दूर गेल्यावर देवला एक आवाज ऐकू आला, "कोण आहे रे तिकडे?"

देवने चमकून आवाजाच्या दिशेने पाहिले. शेजारच्या झाडावर एक घुबड बसले होते. बाबांनी देवला घुबडाचे चित्र दाखवले होते म्हणून त्याला ते लागलीच ओळखू आले. तो म्हणाला,

"मी देव. झोप येत नाही म्हणून मी बागेत खेळायला आलो आहे, तर सगळे झोपलेलेच आहेत. पण तू या वेळी जागा कसा?"

'मी या वेळी जागाच असतो."

"हो. मला आठवले. बाबा म्हणाले होते की घुबड रात्री जागे असतात. बरे झाले, माझ्या बरोबर खेळणार का?"

"मला कोणतेच खेळ खेळता येत नाहीत. आईने मला खेळ शिकवलेच नाहीत."

"मग आईने तुला काय शिकवले?"

"तिने मला उंदीर पकडायला शिकवले आहे. उंदीर पकडताना फार मजा येते. चल तुला दाखवतो."

पण देवला उंदीर पकडण्याची ती कल्पना फारशी आवडली नाही. दुसरे म्हणजे घुबडाचे डोळे फार रागीट होते व तेही देवला आवडले नाहीत. तो म्हणाला, "नको, मला त्यात मजा वाटत नाही."

"तुझी मर्जी." घुबड म्हणाले व उडून गेले.

देव पुढे निघाला.

आणखी थोडे दूर गेल्यावर देवला बागेतला झोपाळा दिसला. तो धावतच तिकडे गेला आणि झोपाळ्यावर बसला. त्याने पाय जमिनीला टेकवले व जोराने झोका घेण्याचा प्रयत्न केला. पण झोपाळा काही जागचा हलेचना. देव म्हणाला, “झोपाळ्या, तू का हलत नाहीस? का बरे डोलत नाहीस? पुढे मागे जात नाहीस? मी तुझ्याशी खेळायला आलो आहे.”

झोपाळा म्हणाला, “देव, मी थकलो आहे रे. काल रविवार होता. सुट्टी होती. किती मुले बागेत आली होती माहीत आहे?”

देवला ते माहीत नव्हते. त्याने विचारले, ‘किती?’

“शंभर. मी मोजली.”

“अरे बाप रे!”

“मग मी थकून जाणार नाही का?”

‘हो.’ देवला ते पटले.

“त्या मुलांनी एक मिनिट मला शांत बसू दिले नाही. एक उतरला की दुसरा बसायचा. आता मी हलणार नाही, डुलणार नाही, मागे पुढे करणार नाही. बिलकूल नाही.”

झोपाळा पुन्हा झोपी गेला.

आता काय करणार?

देव मुकाट्याने पुढे गेला.

झोपाळ्याच्या पलीकडे थोड्या अंतरावर फिसलगुंडी होती. देवची आई तिला घसरगुंडी म्हणते. पण देवला मात्र फिसलगुंडी म्हणायला आवडते. तो पळत तिकडे गेला. त्याला वाटले फिसलगुंडीचे बरे आहे. कुणाला जागे करायचे काम नाही, काही नाही. आपले आपणच एकीकडून वर चढायचे आणि दुसरीकडून खाली फिसलायचे. चढण्यासाठी त्याने शिडीवर पाय ठेवला. लगेच फिसलगुंडी कुरकुर करीत म्हणाली,

“कोण आहे ते?”

“मी देव. मी बागेत खेळण्यासाठी आलो आहे.”

“देव, मला झोपू दे बरे!”

“तू झोप. माझा मी खेळतो. वर जातो, खाली येतो. तू काही करायचे नाही.”

“शहाणाच आहेस. तू माझ्याहून घसरताना माझी झोपमोड होणार नाही का? तुला माहीत आहे का काल किती मुले बागेत आली होती?”

‘शंभर.’

“तुला कसे माहीत?”

“मला झोपाळ्याने सांगितले.”

“मग? प्रत्येकाने वेगळे सांगितले पाहिजे का? एकदा सांगितलेले कळत नाही का? घरी जाऊन झोप बरे. तूही झोप आणि आम्हांलाही निवांत झोपू दे!”

बाप रे! फिसलगुंडी चिडलेली दिसत होती.

देव मुकाट्याने तिथून निघून गेला.

आता काय करावे, देवला कळेना. आपण सोडून सारे जगच झोपी गेले आहे की काय? कुणीच खेळायला सोबती नसेल तर बागेत कशाला यायचे?

देवला घराची आठवण झाली. घराकडे परत जावे असे त्याला वाटू लागले. पण जाण्याचा रस्ता कोठे होता? देव इकडेतिकडे पाहू लागला. तेवढ्यात तो ज्या पायऱ्यांवरून बागेत उतरला होता, त्या पायऱ्या त्याला दिसल्या. सगळ्यात समोरची पायरी त्याला म्हणाली,

“देव, लवकर का परत आलास?”

“काय करू? माझ्याशी खेळायला कुणीच नाही. मला अगदी बोअर झालंय.”

“तुझी आई तुला सांगते ना? रात्र ही झोपण्यासाठी असते. बाहेर फिरण्यासाठी नाही. कारण या वेळी आपले सगळे मित्रही झोपलेले असतात. तू पाहिलेस ना! कळी झोपली आहे, पिल्लू झोपले आहे, कारंजे झोपले आहे. झोपाळा झोपला आहे. चल, मी तुला घरी नेऊन सोडते. तूसुद्धा छानपैकी पांघरूण घेऊन झोपी जा. सकाळी पुन्हा बागेत ये. तुझे सगळे मित्र तुला ‘वेलकम’ म्हणतील.”

पायऱ्यांवरून चढत चढत देव आपल्या खोलीच्या खिडकीपाशी आला. खिडकी उघडून तो आत शिरला. पुन्हा खिडकी लावून घेताना त्याने सहज बाहेर पाहिले. त्याला दिसले, पायऱ्या निघून गेल्या होत्या.

देव अंथरुणावर येऊन पडला. दोन मिनिटांत त्याला गाढ झोप लागली.

**संपर्क – ९५२९३५७४२१**



# महाराष्ट्र राज्य प्रतिके

■ विद्या पोळ– जगताप

एक होता पारवा
रंग थोडा हिरवा
शोधून जर बघाल
त्याचे नाव हरियाल

एक होती खारूटी
जरा आणखी मोठी
शेपटीचा झुपकारू
तिला म्हणती शेकरू

एक झाड जारूळ
फुलांतही जांभूळ
फत्ताडी पाने
पण त्याला म्हणती ताम्हण

एक राजा फळांचा
आवडता सर्वांचा
हो हो जरा थांबा
बरोबर तोच आंबा

खूप मोठ्या आकाराचे
पंखात निळ्या रंगाचे
हे ब्लू मॉरमॉन आहे
फुलपाखरू राज्याचे

ही आहेत राज्याची
प्रतिके सन्मानाची
लक्षात सारी ठेवू या
मनापासून जपू या

संपर्क : ९०११२६७८६३

# मी पत्रपेटी बोलतेय

रेणुका दर्शने

नमस्कार.....अरे दचकू नका असे! इकडे बघा, मी बोलतेय.... अरे लाल डबा नाही रे... पत्रपेटी म्हणा... म्हणजे तुमच्या भाषेत 'Letter box...'

मी तुम्हांला सांगणार आहे माझी आणि पत्रांची कहाणी....नीट ऐका बरं...

हं.. मला माहीत होतं, आता तुम्ही विचारणारच की 'पत्र म्हणजे काय?'

तर पत्र म्हणजे निरोप ... तुमच्या भाषेत मेसेज घेऊन जाणारं कार्ड....

....पूर्वी कबुतरं पत्रं घेऊन जायची.

त्याआधी तर हंससुद्‌धा असे निरोप घेऊन जात. महाकवी कालिदासांनी तर 'मेघदूत' या काव्यात एका मेघालाच निरोप घेऊन पाठवलंय. ज्ञानेश्वर माऊली म्हणतात, ''पैल तो गे काऊ कोकताहे, शकुन गे माये सांगताहे... उड उड रे काऊ... तुझे सोन्याने मढवीन पाऊ...''



मग सांडणीस्वार, घोडेस्वार असे दूत आले. मग मी... पोस्टऑफिस... पोस्टमन... सगळा सरंजाम आला.

तेव्हा फोन नव्हते. घरोघरच्या आया सासरी गेलेल्या आपल्या लेकीच्या पत्राची वाट बघायच्या.

सासुरवाशिणी, शिक्षणासाठी बाहेरगावी रहाणारी लेकरं डोळ्यांत प्राण आणून वाट पहायची पत्राची.

लेकरं पत्रात लिहायची, मला पैसे पाठवा, परीक्षा झाली, वगैरे वगैरे....

कुणी विनोदही घडवायचे, मग मला दिवसभर हसू यायचं.

''पुलं आजोबांनी लिहिलंय, की त्या एवढ्याशा पत्रपेटीनं जर 'आ' वासला तर एक चिमुकले विश्वरूपदर्शनच घडेल!'' पण हे त्यांनी लिहिलं ना ती माणसं पत्रं लिहायची; पोस्टमनची डोळ्यांत प्राण आणून वाट पहायची त्या वेळी! आता मीच दिवसेंदिवस वाट पाहते, कधी एखादे आजोबा काठी टेकत येतील, थरथरत्या हातानं नातवाला लिहिलेलं पत्र टाकतील, तीनतीनदा पाहतील, आत पडलं की नाही! ते पत्र नसेल, तर नातवावरची माया असेल, दुधावरच्या सायीप्रमाणे!

त्यातच आजीची पण माया भरलेली असेल, अगदी काठोकाठ! कधी आईबाबा येतील, लेकाला अगर लेकीला लिहिलेलं पत्र घेऊन....''कधी मिळेल बरं...'' विचार करत परततील.

कधी एखादं छोटं दुडदुडत नाहीतर सायकलवर येईल आणि सांभाळून आणलेलं पत्र टाकील.

कुणी मला परीक्षेत अठ्ठ्याण्णव, नव्व्याण्णव टक्के पडले म्हणून घरी पत्र पाठवेल. असो. तर काय नसायचं त्या पत्रात!

...काळजी, प्रेम, माया, सूचना, सल्ले, आनंद, दुःख, समाधान सगळं सगळं असायचं त्यात! ते इवलंसं कार्ड भावनेच्या ओलाव्यानं चिंब भिजलेलं असायचं. किती आपुलकी, किती माया! प्रेमानं ओथंबलेली पत्रं असायची. ''भाऊरायाला दिवाळीत मला माहेरी न्यायला पाठवा'' म्हणून सासरच्या लेकीचं पत्र, परीक्षेचा निकाल सांगणारं पत्र, ''आंबे- फणस पिकलेत...'' म्हणून कोकणातल्या मामाचं भाच्याला पत्र, कधी लग्न ठरल्याची बातमी, कधी 'तुम्ही आजीआजोबा झालात' म्हणून बाळराजाच्या जन्माची बातमी सांगणारी... एखादी दुःखद बातमी सांगणारं पत्रं पडलं की मलाही वाईट वाटतं, आनंदाची बातमी वाचली की आनंदही होतो. हो, चोरून वाचते बरं मी सगळी पत्रं, सगळ्यांच्या आधी....आता पहिल्यासारखी पत्रंही बघायला मिळत नाहीत म्हणा...

काही जण अतिशय सुंदर, टपोऱ्या, मोत्यासारख्या अक्षरांत पत्र लिहीत तर काही जण कागदावर रट्टे मारल्यासारखं! (हा पुलं आजोबांचा शब्द आहे, माझा नाही...), काही जण मोडीसारखं लिहीत...(मोडी म्हणजे काय ते तुमच्या आजोबांना विचारा, ते सांगतील...)

काही लोक तर निबंध लिहिण्यासारखे पत्र लिहायचे, अगदी सविस्तर म्हणजे 'डिटेल'! तर काही नुसतं क्षेमखुशालीचं चार ओळीचं पत्र लिहायचे. हा येऊन गेला, तो येऊन गेला, कुठल्या एसटीनं आला, बांधकाम एवढं झालं, स्लॅब पडला, फरशा पडल्या इथपर्यंत सविस्तर वर्णन असायचं.

आजोबा आजींचं पत्र म्हणजे तर पत्र नसून आशीर्वाद.... मायेनं भरलेलं... ओतप्रोत... मग ते वाचून डोळे पाणावणार.. त्यात काळजी, माया, सगळं पुरेपूर भरलेलं... अभ्यास करत जा, वेळेवर जेवण कर, तब्येत सांभाळ...

फारच दुःखद किंवा आनंदाची बातमी असेल तर तेव्हा तारा जायच्या. आता बंद झाल्या त्या! पोस्टमन तार घेऊन आला म्हटलं की छात्या दडपायच्या लोकांच्या! कधीकधी या तारांवरचे संदेशही काहीतरी

चूक करून मजा करून जायचे.

विवाहपत्रिका तेव्हा पोस्टानं यायच्या. (गावात मात्र घरोघरी वाजतगाजत, अक्षता घेऊन जात पत्रिका द्यायला!) लग्नसराईत तर पत्रिकांचे गठ्ठेच्या गठ्ठे पडायचे. नाही म्हटलं तरी मला दया यायची पोस्टमनची! सायकलवर किती फिरणार बिचारा!

दिवाळीत पोस्टमनकाका पोस्त मागायला येत. पोस्टमनला तेव्हा खूप 'भाव' होता, तुमच्या भाषेत! तेव्हा सायकलवर यायचे, आता गाडीवर येतात. पण त्यांच्याकडं कुणी साधं बघतसुद्धा नाही.

आणि कधीकधी पोस्टमन काकांना पत्र वाचून दाखवायचं काम पण असायचं. प्रेमानं करायचे ते हे काम! तेव्हा भावनांचा ओलावा होता, आतासारखं कोरडंठाक नव्हतं ना सगळं... एखादं पत्र आलं की दिवसभर त्या पत्राचीच चर्चा आणि पारायण केल्यासारखं वाचन चालायचं घरोघर! (तुम्ही म्हणाल, दुसरे उद्योग नव्हते का? पण तुमच्या आताच्या उद्योगांपेक्षा हे उद्योग आवडायचे मला!) ही पत्रं म्हणजे आठवणी, सुख- दुःखं यांचा ठेवा.. भावविश्व उलगडणारा! त्या व्यक्तीचं अक्षर पाहिलं की प्रत्यक्ष भेट झाल्यासारखं वाटे. आता कुणाचं अक्षर कसंय हेसुद्धा माहीत नसतं. अक्षरावरूनच कळायचं तेव्हा, कुणाचं पत्र आलंय म्हणून ! आणि ते जपून ठेवायचं, कधीतरी काढून वाचायचं. तेव्हा आलेली पत्र जपून ठेवायला तारेकट असायची. म्हणजे त्या तारेला जुनी पत्रं लावून ठेवलेली असायची. केव्हाही काढून वाचता यावीत म्हणून! ही जुनी पत्रं म्हणजे आठवणींची उजळणी, नातेवाईकांची आठवण, त्यांची अक्षरभेट आणि पुढच्या पत्रांची आस!

Delete करणं वगैरे भानगडी नव्हत्या तेव्हा! सगळं मोकळंढाकळं होतं म्हणूनच समाधान होतं.

WhatsApp, मोबाईलनं विनाकारण नात्यात संशय पेरायला सुरुवात केली, गैरसमज पसरवायला सुरुवात केली. शिवाय नको त्या गोष्टींत वेळ व्यर्थ जाऊ लागला ते वेगळंच! आता मेसेज पाठवला की, वाचला का नाही तेही कळतं.

पूर्वी पत्र पाठवलं की झालं. ते त्याला मिळेल, तो वाचेल हे गृहीत धरलेलं. हॉस्टेलवर सुखरूप पोचल्याचं पत्र घरी आठ दिवसांनी पोचायचं. भाचेमंडळी उन्हाळ्याच्या सुट्टीला अमूक अमूक तारखेला येणार पण कुठल्या एसटीनं येणार माहीत नसल्याने मामा लोक स्टँडवर प्रत्येक एसटीला सायकल घेऊन हजर रहायचे. राखीबरोबर पत्राच्या रूपानं बहिणीची मायाही पोच व्हायची.

रक्षाबंधन, दिवाळी, लग्नाचा सीझन म्हणजे लग्नसराईचे दिवस असले की मी भरून वहायचे. आता, तळात कुठंतरी एखादं पत्र, तेही कोरडंच, ठणठणीत!

आता कॉल्सना फारसे पैसे पडत नाहीत पण काय बोलायचं हाच मोठा प्रश्न सर्वांसमोर असतो.

त्या WhatsApp नं तर पत्रांना खाऊन का गिळूनच टाकलं. लोकांचे तर हात धरलेत का काय कुणास ठाऊक? पत्रच काय, काहीच लिहायला पेन उचलत नाहीत. अशानं 'वाचायला येतंय पण लिहायला नाही' अशी अवस्था होते की काय अशी धास्ती वाटते. (त्या वेळी लिहिता- वाचता न येणारे लोकसुद्धा शेजाऱ्यापाजाऱ्याकडून, शाळेतल्या गुरुजींकडून, पोस्टातल्या लेखनिकाकडून पत्र लिहून घेत.)

त्या मोबाईल, व्हॉटस्‌ॲपमुळे अचानक भेटीचा आनंदच नाही, पत्राची, पोस्टमनकाकांची वाट पहाणं नाही.  शाळेत जाताना लेकरांना कामच असायचं!

लहानलहान मुलं पत्रं टाकायला यायची. ती टाचा उंच करून पत्र टाकायची. फार बरं वाटायचं.

तुमच्याएवढी मुलं मोठ्यांनी पिटाळलं की कार्डं, ५-१०-१५ पैशांची तिकीटं आणायला पळत.

टपालासाठी एसटीची खास टपालगाडी होती

तेव्हा! आणि 'आईचं पत्र हरवलं, ते मला सापडलं' हा मुलांचा खेळ होता.

पत्रं ही सुखदुःखाची, आनंदाची देवघेव करणारं साधन होतं.जन्म, बारसं, लग्न ठरलं की कार्ड लिहायला बसायचं. तेही सविस्तर! सांत्वन करणारी पत्रंही सविस्तर असायची. आतासारखी नुसतंच नमस्कार आणि इमोजीज नव्हते. त्या पत्रांत भावनांचा ओलावा असायचा. ते पत्र वाचून वाचणाऱ्याला उभारी वाटायची, धीर यायचा, मनाला दिलासा वाटे. मी काय म्हणते, एकदा सहज म्हणून पोस्टात जा, कार्डं- पाकिटं, तिकिटं विकत घ्या, आजीआजोबांना, मामामामींना, मावशीला, भावंडांना पत्र लिहा.

बघा किती छान वाटतं ते!

उन्हाळ्याची सुट्टी सुरू झाली, परीक्षा संपली, पेपर कसे गेले...काहीही लिहा, पण लिहा.

हो, हो माहितीय मला, शाळेत दहा मार्कांचं पत्रलेखन असतं ते! पण पत्र फक्त मार्कांपुरतं शिल्लक ठेवू नका. ..मग आता पोस्टात जा, कार्ड आणा आणि बसा बघू पत्र लिहायला... बघा तुमचा वेळ किती छान जातो ते आणि लिहायची पण सवय लागेल हाताला!

राखीबरोबर भावाला स्वतःच्या अक्षरात पत्र लिहा, बघा तो कसा खूश होतो ते!

गणेशोत्सवाच्या, दिवाळीच्या, नवीन वर्षाच्या शुभेच्छा देणारी छानशी शुभेच्छापत्रं (Greeting Cards) स्वतः तयार करा, त्याबरोबर छोटंसं का होईना पत्र लिहा, मग ते स्वतःच्या हातानं माझ्यात टाका, बघा किती आनंद होतो ते. मग आजीआजोबा, आत्या, मावशी, मामा तुम्हांला पत्र लिहितील. वाट बघण्यातला सुद्धा आनंद किती छान असतो ते कळेल. मग पोस्टमनकाकांकडे पळत जाल, म्हणाल, ''काका, माझ्या आजीचं पत्र आलं का हो? माझ्या मावशीचं पत्र आलं का हो?''

खालचे लेटरबॉक्सही उपेक्षित रहाणार नाहीत. नाहीतर आजवर त्यात फक्त विजेची आणि फोनची बिलं पडत आली आहेत. आता पत्रंही पडतील, तुम्ही येताजाता पाहाल तिकडे...

WhatsApp पहाणाऱ्या आज्यांनो, आयांनो ... पोरांना हात धरून पत्र लिहायला बसवा.

मुलांना पत्र लिहायला उद्युक्त करा, तुम्ही तुमच्या लहानपणी लिहीत होता ना, तशी पत्रं आधी तुम्ही लिहा, मग त्यात मुलांना चार ओळी का होईना लिहायला सांगा.

स.न.वि.वि., सा.न., स.न., चि.सौ., अ.उ.आ., ता.क. यांचे अर्थ मुलांना समजावून सांगा.

येत जा माझ्याकडे, वरचेवर, तुमची वाट पहात आहे मी. आधी सर्वांचीच लगबग असायची.

आता पोस्टही 'स्मार्ट' झालंय बरं का तुमच्यासारखंच....आणि हो, पुलं आजोबांचे 'माझे पौष्टिक जीवन' जरूर वाचा. एकदा पोस्टाला भेट द्या. (तुमच्या आईबाबा, मामा मावश्यांना तर वेगवेगळी पोस्टाची तिकीटं जमवण्याचा छंद होता. भारत सरकारतर्फे 'स्मरणार्थ' तिकिटंही प्रकाशित केली जातात.) तुमची लहानलहान पावलं येताना दिसली आणि ती उंच करून करून माझ्यात पत्र टाकताना दिसली की मला आनंदाचे भरते येईल आणि आत पत्रं भरतील तशी मीही समाधानाने भरून जाईन!

मग माझा ऊर मग अभिमानाने भरून जाईल, मीही टम्म भरलेली असेन ना!

बघा, विचार करा, मला कळवा !

पत्र लिहून कळवा. आणि हो, मी WhatsApp वर नाही बरं का !

धन्यवाद! कळावे.

तुमचीच,

पत्रपेटी.

**संपर्क ९१६८०२९२९२**




■ संदीप राठोड

साहित्याची खाण मराठी
कणाकणातील प्राण मराठी
अन्यायाच्या छाताडावर
फडफडणारे निशाण मराठी

डोळ्यामधला राग मराठी
छातीमधली आग मराठी
स्वराज्यासाठी लढणारा तो
सह्याद्रीचा वाघ मराठी

चराचराचा धर्म मराठी
आयुष्याचे मर्म मराठी
नसानसांतून वाहणारा
रक्ताचा गुणधर्म मराठी

संतांचे विचार मराठी
ज्ञानाचे भंडार मराठी
बोल बोबड्या बाळावरती
घडणारे संस्कार मराठी

ओठांवरचे गाणे मराठी
शेतकऱ्याचे धान मराठी
आण मराठी मान मराठी
महाराष्ट्राची शान मराठी

संपर्क : ९९२२६६२५९५



# कुतूहल

वसुंधरा भोपळे, ७३८७४३२९४१

'किशोर' मित्रांनो, 'किशोर' जानेवारी २०२५ च्या अंकातील कुतूहलची किती उत्तरे तुम्ही बरोबर दिलीत? या अंकात दिलेल्या उत्तरांशी आपण दिलेली उत्तरे ताडून पाहा. तुमच्यासाठी आणखी काही प्रश्न दिले आहेत. स्पर्धकांनी प्रश्नांची उत्तरे कोणाचीही मदत न घेता स्वतंत्रपणे लिहून पाठवण्याचे पथ्य काटेकोरपणे पाळावे. अचूक उत्तरे 'किशोर'कडे २५ फेब्रुवारी २०२५ पूर्वी अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावीत.

**१) नुकतेच उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्काराने सन्मानित झालेल्या प्रमिला कौतिकराव सूर्यवंशी या कोणत्या कलेशी संबंधित आहेत?**

१) लावणी लोकनृत्य २) अभंग गायन
३) नाट्य अभिनय ४) शास्त्रीय संगीत

**२) महात्मा फुले यांनी पुण्यात सत्यशोधक समाज ही संस्था कोणत्या साली स्थापन केली?**

१) १८४८ २) १८७३ ३) १८५६ ४) १८९०

**३) आशियायी विकास बँकेचे मुख्यालय कोठे आहे?**

१) मनिला (फिलिपाइन्स) २) जकार्ता (इंडोनेशिया)
३) बँकॉक (थायलंड) ४) हनोई (व्हिएतनाम)

**४) सातवाहन साम्राज्याच्या राजवटीत महाराष्ट्रात सुवर्णकाळ होता असे मानले जाते. खालीलपैकी कोणत्या जिल्ह्यातील गोंडपिपरी तालुक्यात नुकतेच सातवाहन संस्कृतीचे अवशेष सापडले आहेत?**

१) नागपूर २) नाशिक ३) चंद्रपूर ४) गडचिरोली

**५) संयुक्त राष्ट्रांची पर्यावरण संस्था असलेल्या UNEP चा 'चॅम्पियन ऑफ अर्थ' जीवनगौरव पुरस्कार २०२४ खालीलपैकी कोणाला मिळाला?**

१) डॉ. मारुती चित्तमपल्ली. २) गोदावरी परुळेकर
३) डॉ. माधव गाडगीळ ४) डॉ. धनंजय गोडबोले

**६) वयाच्या अवघ्या १८ व्या वर्षी जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेचा विजेता ठरलेल्या भारताचा ग्रँडमास्टर डी गुकेश याने सिंगापूर येथे झालेल्या महाअंतिम सामन्यात खालीलपैकी कोणत्या देशाच्या ग्रँडमास्टर डिंग लिरेन याला चेकमेट दिला?**

१) जपान २) दक्षिण कोरिया
३) चीन ४) व्हिएतनाम

**७) वेळोवेळी भारतीय संसदेच्या बैठकांचे सत्र बोलावणे ही कोणाची जबाबदारी असते?**

१) पंतप्रधान
२) राष्ट्रपती
३) उप राष्ट्रपती
४) विरोधी पक्षनेता

**८) १९८४ साली भोपाळमध्ये झालेल्या युनियन कार्बाईड विषारी वायू दुर्घटनेतील मृतांच्या स्मरणार्थ दरवर्षी २ डिसेंबर रोजी खालीलपैकी कोणता दिवस साजरा केला जातो ?**

१) राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिवस
२) राष्ट्रीय वायू दुर्घटना स्मृती दिवस
३) राष्ट्रीय आपत्ती नियंत्रण दिवस
४) राष्ट्रीय जन जागृती दिवस

**९) आंतरराष्ट्रीय दिव्यांग दिन : ३ डिसेंबर :: आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिन?**

१) ३ जानेवारी. २) १० जानेवारी
३) १० डिसेंबर ४) १६ डिसेंबर

**१०) दरवर्षी २८ फेब्रुवारी रोजी 'राष्ट्रीय विज्ञान दिवस' हा खालीलपैकी कोणत्या शास्त्रज्ञाने लावलेल्या शोधाचा गौरव म्हणून साजरा केला जातो?**

१) सी. व्ही. रमण.
२) जगदीश चंद्र बोस
३) सुब्रमण्यम चंद्रशेखर
४) मेघनाद साहा

**११) भारतामध्ये सर्वेक्षणासाठी --------- येथील समुद्र सपाटीची सरासरी उंची शून्य मानली जाते.**

१) मुंबई २) कन्याकुमारी
३) चेन्नई ४) कोवालम

१२) मुंबई येथे आयोजित महाराष्ट्र राज्यस्तरीय टपाल तिकिटांचे प्रदर्शन 'महापेक्स २०२५' चा शुभंकर खालीलपैकी कोण आहे?
१) महाराष्ट्राचे राज्य फुलपाखरू 'ब्लू मॉरमॉन'
२) महाराष्ट्राचा राज्य पक्षी 'हरियाल'
३) महाराष्ट्राचे राज्य फूल 'जारुळ'
४) महाराष्ट्राचा राज्य प्राणी 'शेकरू'


१३) महाराष्ट्र राज्यातील एक कीर्तनकार आणि समाजसुधारक म्हणून प्रसिद्ध असलेल्या संत गाडगे बाबांचा जन्म खालीलपैकी कोणत्या जिल्ह्यात झाला?
१) अमरावती २) यवतमाळ ३) वर्धा ४) भंडारा

१४) स्वराज्याच्या आरमाराचे केंद्र म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांनी मालवणच्या -------- बेटावर सिंधुदुर्ग किल्ल्याची स्थापना केली.
१) घारापुरी २) उंदेरी ३) खांदेरी ४) कुरटे

१५) 'मराठी भाषा गौरव दिवस' हा दरवर्षी खालीलपैकी कोणाच्या स्मरणार्थ साजरा करण्यात येतो?
१) विष्णू वामन शिरवाडकर (कुसुमाग्रज)
२) ग. दि. माडगूळकर (गदिमा)
३) दामोदर माधव कुलकर्णी (माधवसुत)
४) कृष्णाजी केशव दामले (केशवसुत)

## चित्रकोडे
रचना - घनश्याम देशमुख

## जानेवारी चित्रकोडे उत्तर




## किशोर डिसेंबर २०२४ कुतूहल यशस्वी स्पर्धक

- **अहिल्यानगर** – कु. वेदिका गमे
- **सातारा** – कु. सुवीर फडे

## कुतूहल (जानेवारी २०२५) ची उत्तरे

| | | |
|---|---|---|
| १) – २, | ६) – १, | ११) – २, |
| २) – २, | ७) – ३, | १२) – ४ |
| ३) – २, | ८) – ४, | १३) – २, |
| ४) – ३, | ९) – १, | १४) – १, |
| ५) – ३, | १०) – २ | १५) – २ |

## किशोर डिसेंबर २०२४ चित्रकोडे यशस्वी स्पर्धक

- **ठाणे** – कु. मुक्ता काशिद, अनन्या भेरे
- **धाराशिव** – कु. वेदिका भोसले, कु. शुभांगी रोकडे, कु. प्राची काकडे, कु. श्रुती भोसले, कु. श्रावणी साखरे, कु.सानिका माळी, कु. आदिती जाधव, कु. शिवानी सुरवसे, कु. मेघना माळी, कु. सिद्धी महामुनी, कु.अक्षता रोकडे, कु. श्रावणी भोसले, कु. शिवानी मिटकरी, कु. प्रतीक्षा क्षीरसागर, कु. गितांजली माने, कु. स्नेहल वरपे, कु. रागिनी रणदिवे, कु. समीक्षा माळी, कु. दिपक जाधव, कु. अंजली सुरवसे, कु. कन्हैय्या भोसले, कु. अनुष्का माने, कु. चेतना कुंभार, कु. आदिती क्षीरसागर
- **सिंधुदुर्ग** – कु. दर्श परब
- **अहिल्यानगर** – कु. वेदिका गमे
- **सातारा** – कु. श्रीयांश सावंत, कु. सुवीर फडे
- **पुणे** – कु. तन्वी भालेराव, सचिन लेले
- **नागपूर** – कु. निरजा कुलकर्णी
- **अकोला** – कु. अरीबा खान
- **अहिल्यानगर** – कु. ज्ञानेश्वरी जाधव, कु. विराज पवार, कु. आराध्या रुपवते, कु. अमृता घोलप, कु. साईराज मोहिते, कु. अक्षरा हासे, कु. ओवी बड, कु. जागृती भालेकर, कु. शिवन्या तोरमल, कु. स्वरा सातपुते, कु. आयुष भालेकर, कु. मनस्वी भालेकर, विहान सातपुते, कु. संस्कृती मोहिते
- **नागपूर** – कु. अवनीज्ञ जोशी
- **पुणे** – कु. ईश्वरी गायकवाड, कु. श्रेया एरंडे, कु. आरोही वामन, कु. प्रणिता शिंदे, कु. स्वरा खरमाळे
- **रत्नागिरी** – कु. सोहम शांताराम, कु. सोनल भुवड, कु. तेजस भुवड, कु. शरिफा जोगले, कु. अनिश भुवड, कु. साजिरी भुवड
- **बेळगाव** – कु. सर्वेश आपटे

# भावी आधारस्तंभ

माणूस जेव्हा एखादी चांगली गोष्ट करतो, तेव्हा आपण त्याला चांगला म्हणतो. अशा चांगल्या गोष्टी तुम्हीही नक्कीच केल्या असतील.

- तुम्ही दुसऱ्यांबद्दल आपुलकी आणि सहानुभूती दाखवता का?
- जे तुमच्यापेक्षा लहान आणि दुर्बल आहेत त्यांचे रक्षण करता का?
- ज्यांना मदतीची गरज आहे त्यांना मदतीचा हात देऊ करणे म्हणजे चांगुलपणा, असे तुम्हांलाही वाटते ना?

मग लागा पाहू लिहायला. त्यासाठी सदर आहे - 'भावी आधारस्तंभ'. तुम्हांला मानधन व वर्षभर अंक मिळेल. तुम्ही केलेल्या सत्कृत्याचा १० ते १५ ओळी मजकूर सुवाच्य अक्षरांत लिहा. तुमचे संपूर्ण नाव, पत्ता (पिनकोड नंबरसह), शाळेचे नाव, वय, इयत्ता इत्यादी तपशील द्या. पासपोर्ट आकाराचा फोटोही लावा. पाकिटावर रु. ५/- चे तिकीट लावून अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवा.



आमच्या शाळेजवळ अंगणवाडी आहे. तेथे एक चिमुकला मुलगा बसला होता. तो खूप रडत होता. पाहिले तर तेथे कोणीच नव्हते, त्यांची शिक्षिका रजेवर होती. तो एकटा तेथे रडत होता. म्हणून मी त्याला विचारले, ''तू येथे एकटा काय करतोस?'' तो म्हणाला, ''मी शाळेत आलो आहे.'' मी म्हटले, ''आज तुमच्या मॅडम काही येऊ शकणार नाही.'' त्याला विचारलं ''तुझी आई कोठे आहे?'' तो म्हणाला, ''घरी. आईने मला शाळेत पाठवलंय.'' त्याला खूप भूक लागलेली. तो काही घरी येत नव्हता. मी विचारले. ''तुला काय खायला आवडतं.'' तो म्हणाला, ''मला बिर्यानी आवडते.'' मी म्हणाले ''चल हॉटेलमध्ये जाऊ.'' तो हॉटेलमध्ये यायला तयार झाला, मग मी त्याला सायकलीवर बसवलं नि त्याच्या घरी नेले. तो मुलगा आजारी होता.. आईने त्याला शाळेत पाठवले होते. मी त्याच्या आईला सर्व काही सांगितले. त्याच्या आईने त्याला जवळ घेतले व माझे आभार मानले. मी शाळेत गेल्यावर आमचे वर्गशिक्षक खैरे सरांना घडलेली हकीगत सांगितली. सरांनी सर्व मुलांमुलींच्या समोर माझे कौतुक केले. मला खूप आनंद झाला.

**कु. दीप्ती दीपक कवितके,** इयत्ता - ६ वी, जि. प. प्राथमिक शाळा, मोहिते वस्ती (सांगवी), केंद्र- राजाळे, ता. फलटण, जि. सातारा- ४१३११५



सुट्टीचा दिवस होता. मी माझ्या मित्राबरोबर पोहायला निघालो होतो. शेतातून चाललो होतो. एका शेतात ड्रॅगनफ्रुटचे पीक घेतले होते. पिकाच्या सुरक्षिततेसाठी त्या छोट्या शेताला तारेचे जाळीदार कुंपणही लावले होते. त्या कुंपणातून सहजासहजी आत जाणे शक्य नव्हते, तरीही कुत्र्याचे एक पिल्लू कुंपणातून आत गेले होते. त्याला बाहेर येता येत नव्हते. त्याने खूप प्रयत्न केला, उड्या मारल्या, कुठूनतरी वाट असेल यासाठी त्याने इकडेतिकडे धावाधाव केली; पण काहीच मार्ग मिळत नव्हता. आता ते पिल्लू मोठ्याने ओरडू लागले. त्याचे हाल मला बघवेनात. मी माझ्या मित्राच्या मदतीने आत गेलो आणि हळुवार त्या पिल्लाला बाहेर काढले. पिल्लू जोरजोराने आनंदात शेपटी हालवत होते. आमच्या पायात घुटमळत होते. ते पाहून आम्हांलाही खूप आनंद झाला.

**अवधूत दिगंबर ननवरे ,** इयत्ता- पाचवी, जि. प. केंद्रशाळा निंबळक, ता. फलटण जि. सातारा- ४१५५२३



मी शाळेतून घरी जात असताना मला एक मांजराचे पिल्लू दिसले. ते पिल्लू रस्त्यावर बसले होते. पाठीमागून एक मुलगा ओरडला. ''आमची माऊ, आमची माऊ, मागून गाडी आली.'' म्हणून ओरडत होता. मांजर रस्त्यावर बसले होते आणि गाडी मोठी होती. मी पटकन मांजराच्या पिल्लाला उचलले. जर मी मांजराला उचलले नसते तर त्याचे प्राण गेले असते. मी त्या मुलाला त्याचे मांजराचे पिल्लू दिले. तो खूप खूश झाला. त्याने सर्व घडलेले त्याच्या घरच्यांना सांगितलं, त्यांनी मला बोलावले व माझे कौतुक केले. मलाही खूप आनंद झाला. सकाळी मी आमच्या भगत सरांना ही माहिती सांगितली. त्यांनी मला एक किशोर मासिक बक्षीस दिले. मला फार फार आनंद झाला.

**कु. दुर्गा विभीषण सापते**
जि.प.प्राथ.शाळा, केळसांगवी,
ता. आष्टी, जि. बीड– ४१४२०८.



एकदा मी आणि माझा मावसभाऊ रस्त्याने चाललो होतो. तेव्हा एक आजी बसलेली होती. तिला उठता येत नव्हते म्हणून तिने आम्हांला बोलावले. आणि म्हणाली, ''अरे मला उठता येत नाहीये. तुम्ही मला उठायला मदत कराल का?'' आम्ही पळतच तिकडे गेलो आणि त्या आजीला उठवले. आम्ही चालू लागलो आणि आजीने आम्हांला परत बोलावले. आणि म्हणाली, ''तुम्ही मला उठवले म्हणून मी तुम्हांला ही खाऊसाठी दहा रुपये बक्षीस देते.'' तिने आम्हांला दहा रुपये दिले. आम्ही आनंदाने घरी आलो.

**कु. यश निलेश शिंदे**
इ.३री, शाळा जि.प.प्राथमिक
शाळा ठाणगांव,
ता. सिन्नर, जि. नाशिक– ४२२१०३



मी व माझा परिवार आम्ही सर्व जण वझेगावला दरवर्षी जात असतो. या वर्षी सुद्धा आम्ही तेथे गेलो होतो. माझी मैत्रीण नंदिनी माझ्यासोबत आली होती. तेथे आम्ही रामचंद्र महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले. आम्ही तेथील परिसरात खेळत असताना आम्हांला एक आजी दिसली. ती खूप थकलेली होती. ती खूप वेळेपासून आम्हांला पाहत होती. नंदिनी आणि मी बिस्किट खात होतो. त्या आजीला खूप भूक लागली असेल असे मला वाटले. मी तिला माझ्याजवळची काही बिस्किटे तिला दिली. माझ्याकडची बिस्कीटे घेतल्यावर ती खूप गोड हसली आणि माझ्या डोक्यावर हात ठेवला. तिच्या चेहऱ्यावरचे हसू पाहून मला खूप बरे वाटले. आई नेहमी सांगत असते की, तहानलेल्यांना पाणी व भुकेल्याला अन्न देण्यात जो आनंद आहे तो कशातच नाही. आम्ही तेथून घरी येण्यासाठी निघालो तरी मला आजीचा चेहरा आठवत होता.

**कु. भक्ती रामपाल उदेवाल,** इयत्ता– ५वी,
जि.प.पूर्व माध्यमिक शाळा जैनपूर, ता. दर्यापूर, जि. अमरावती– ४४४७०६.



**विघ्नेश दीपक पाटील,**
इयत्ता ६ वी, केंद्रीय प्राथमिक शाळा, माण,
ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर- ४१५१०१

# तो हवाहवासा वाटला

पुन्हा एकदा इतिहास डोकावताना
तो हवाहवासा वाटला...

रयतेच्या मनात, मातीच्या कणात
मुरलेला तो राजा
पुन्हा एकदा हवाहवासा वाटला...

सर्व रयतेची शान व शत्रूचा मान
जपणारा तो राजा
पुन्हा एकदा हवाहवासा वाटला

लहानपणी त्यांचे पुस्तकातील फोटो पाहिले
तेव्हा तो राजा आमच्यातलाच एक वाटला
खूप ज्ञान असणारा तो राजा
पुन्हा एकदा हवाहवासा वाटला...

थोडे मोठे झालो त्यांचे पूर्ण आयुष्य वाचलं
प्रत्येक अडचणीवर मात
करणारा तो राजा
पुन्हा एकदा हवाहवासा वाटला...

खूप गड जिंकले पण एकाही गडाला स्वत:चे
नाव दिले नाही असा हा
रयतेवर नि:स्वार्थी प्रेम करणारा तो राजा
पुन्हा एकदा हवाहवासा वाटला...

**कु. पल्लवी जोतिबा रेडेकर,** मु.पो.मनवाड,
ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर- ४१६५०६

## उमलती प्रतिभा

# छत्रपती शिवाजी महाराज

शिवनेरीवर जन्म झाला शिवबाचा,
आई जिजाऊंचा तो लाडाचा,
सोसला वार त्यांनी तलवारीचा,
शोभे भाळी त्यांच्या टिळा गंधाचा

बाळ शिवाजी होता जिद्दीचा,
बीमोड केला त्याने खानाचा,
पुत्र होता जिजाऊंचा,
करू त्यांना मुजरा मानाचा


रयतेला मान देत राहू,
आम्ही शिवबांसारखे होऊ,
शिवरायांना पुन्हा आठवू
स्वराज्याचे ध्येय पुन्हा साकारू


राजांनी खूप किल्ले जिंकले,
रयतेला उभे केले,
जाताजाता आपल्या आठवणी ठेवून गेले,
जनतेच्या स्मरणात ते राहिले


शिवरायांनी रयतेला जीवन मानले,
रयतेसाठी ते झटत राहिले,
जिजाऊंचे स्वराज्याचे स्वप्न पूर्ण केले,
माणसांनी त्यांना दैवत मानले


**कु. कार्तिकी जनार्दन कोरगांवकर**
इयत्ता- सातवी,
शाळा - जि.प.पू. प्राथमिक केंद्र शाळा,
शेर्ले नं.१, मु.पो.शेर्ले, (नागधुरीवाडी),
ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग- ४१६५१४









**श्रेया सुभाष तगवाले,** इयत्ता- सहावी.
जिल्हा परिषद माध्यमिक शाळा आष्टा हरिनारायण, तालुका- आष्टी, जिल्हा- बीड- ४१४२०३


कुणीतरी आहे तिथं
घनश्याम देशमुख संपर्क : ९८२३४१३६२९
जंगलातील कच्च्या रस्त्यावर मी मोठ्या ट्रकच्या टायरचे ठसे बघितले आणि जंगलात काही वृक्षतोड झाली हेही मला दिसले. तेव्हाच मला शंका आली.
जर गावातले लोक भुताला घाबरून जंगलात येतच नाहीत, मग हे करतोय कोण?
खूप हुशार आहेस मुला.
भीमा दरवाजा उघडल्याचा आवाज येतोय. आपला ट्रक आला असावा.
एक मोठ्ठा ट्रक दरवाज्यातून हवेलीच्या आज येऊन थांबला.
भीमा, या दोन मुलांचं काय करायचं रे?
ते आता तूच ठरवं आणि लवकर इकडे ये. ही सर्व लाकडे आपल्याला ट्रकमध्ये लोड करायची आहेत.



सिकंदर, तू भुताचा शोध तर लावला पण आपण इथे अडकलो रे...
चंदू, काहीही होणारा नाही तू पुढे बघ काय होतं ते?
छगन, रमेश... ट्रकचा कंटेनरचा दरवाजा उघडा...तुमचे असे चेहरे का उतरलेत?
दरवाजा उघडाच आहे तुम्ही बघा त्यात काय आहे.
भीमा धावतच ट्रकच्या मागच्या बाजूला गेला.
प..पोलीस!
हो पोलीस! या जंगलात शिरण्यापूर्वीच मी माझ्या मोबाईलवरून त्यांना फोन केला होता..
पोलिसांनी भीमा आणि त्याच्या तीन साथीदारांना बेड्या ठोकल्या व ताब्यात घेतले.
ही टोळी या जंगलातील झाडे तोडून या जुन्या हवेलीत साठवत होती. व नंतर शहरात विकायची. जंगलात गावकरी येऊ नये म्हणून भुताचा बनाव केला होता.
आम्ही या हवेलीकडे निघालोच होतो. वाटेत या चोरट्यांचा ट्रक दिसला. त्यांना फटके दिले आणि त्यांनी हा रस्ता दाखवला.
समाप्त

# शाळा माझी रे मराठी

■ अमोल टेकाम






बालपणीची शाळा
माझ्या आयुष्याचा मळा
पुस्तकात पेरतसे
दिसे अक्षरांच्या माळा

पीक पाण्यावरी येता
त्याचा आनंद सोहळा
पुस्तकांच्या पाठामध्ये
दिसे सावताचा मळा...

कोऱ्या, कोऱ्या पानांमध्ये
केली कशी नांगरणी
अक्षराच्या लेखणीने
कशी साधली पेरणी...

शाळा माझी रे मराठी
माती लावून ललाटी
शारदेच्या उत्सवात
माझी भरतील ओटी...

संपर्क : ८५५२८३१०१२






# School Vegetable Garden

■ Sarita Upase

Rinku, Pinku come on kids,
Let's sow  some vegetable seeds.

Take the plough and the spade,
loosen the soil across the place.

We will put a fence around,
Then will take some rest on ground.

Relaxed a lot, now back to work,
Give a clap and give a jerk.

Sow the seed with a smile,
It will stick to the soil.

Then will water for the seeds to sprout,
and one fine day saplings will come out.

Contact : 9403661370



# Weighing The Elephant

Dr. Rasika Thosar

One day, a traveller from a distant land arrived in China. He wore richly embroidered robes and had a long and impressive beard!

"Where do you come from, stranger?" asked the harbourmaster. The traveller smiled and said, "I come from far-off India. My master is a great king, and he sent me to give a magnificent gift to your emperor. I need a hundred of your men to help unload it!"

The harbourmaster was very curious. "This gift must be heavy, then!" he replied. "And very valuable!"

Dozens of dockworkers heaved a huge crate off the traveller's ship and loaded it onto a cart pulled by twenty strong oxen.

A heavy creature was moving around inside the crate, and the harbourmaster saw something



snake-like poke out of a hole.

The traveller drove the cart through China. Everywhere he went, people asked him what was in the crate.

He would just smile and say, "It is a surprise for your emperor!"

By the time the man arrived in the capital, the emperor had heard news about him and his enormous gift. The stranger was ushered into the imperial court, where the emperor and his ministers awaited him!

The traveller bowed deeply and said, "My master sent me here with a present, O great emperor!"

Servants opened the crate. The sides fell away to reveal a great grey beast bigger than any the ruler or his ministers had seen before!

"Its legs are as thick as tree trunks!" gasped the emperor. "The animal's nose looks like a grey snake!" said his wife in surprise.

"Why, those teeth sticking out of its mouth are longer than my arm!" mused a minister.

The stranger laughed. "This precious beast is an elephant, and there are many in my country. My master sent it to you, in the hope that you and he might become friends."

The emperor thanked the man for the magnificent gift.

"This is the most interesting present I have ever received!" he said. "I will summon my wisest advisors to study it and work out how much it is worth!"

Messengers were sent out, and soon the cleverest men in China were at the emperor's court, poking and prodding the elephant.


"How can we work out its weight?" asked the emperor. "We must know how heavy it is to measure its value!"

"Oh, that's simple!" said one scholar as he adjusted his spectacles. "We need to put it on a scale!"

"But we don't have a scale big enough!" the emperor protested.

An old sage stroked his beard. "Why don't we cut the animal up and weigh the bits?"

The emperor was shocked. "Certainly not, that would be wrong! I don't want to do anything that could harm this incredible animal. Anyway,



it would be worthless if it was dead."

Then they heard a little voice. "I know how to figure it out!"

It was the emperor's son!

The men in the room turned to the boy with great curiosity. "What do you suggest?" asked the emperor.

"Easy! Just put it in a boat. The weight of this 'elephant' will push it down in the water, and you draw a line on the boat where the water comes up to."

"But how does that tell us how much it weighs?" asked a sage.

"Simple!" smiled the boy. "Take the elephant out, and then start putting rocks in the boat. Stop when the boat is as low in the water as it was when the elephant was in it. Weigh the rocks in the boat. They will be as heavy as the elephant!"

"That is an amazing idea!" said the empress, beaming with pride. "You are so clever, my son!"

The scientists did as the boy said and worked out how heavy the animal was. It weighed more than four tons, and the emperor's advisors concluded that it was very valuable indeed.


But even though the elephant was precious, the most valuable thing of all was the boy's wisdom!

**Contact : 9970273841**


# Funny Puzzle

Ghanshyam Deshmukh

**Fill the names of the fruits in the grid given below.**





**Spot and circle six differences between the two pictures.**



# चित्रकोडे

रचना - घनश्याम देशमुख

**हे चित्रांचे शब्दकोडे आहे. यात चित्रांची नावे लपलेली आहेत. प्रत्येक चित्र बघून खालील चित्रकोडे पूर्ण करा.**




## सूचना

१) स्पर्धकांनी आपले नाव केवळ पाकिटावर न लिहिता कोडे सोडवले असेल त्या कागदावर लिहिणे आवश्यक आहे.


२) कोड्याचे उत्तर पाठवण्याची अंतिम तारीख २५ फेब्रुवारी २०२५.

३) कोड्याचे उत्तर मार्च २०२५ च्या अंकात प्रसिद्ध होईल.

४) कोडे वेगळ्या कागदावर सोडवले तरी चालेल.

Registered Postal.No. PCW/076/2024-2026 RNI NO. 22679/72
Date of publication 26.01.2025 Date of Posting 27th & 28th January 2025 posted at PUNE PSO, GPO- 411 001

(License to Post without prepayment of postage No. WPP-53/2024-2026)




प्रति,

**If not delivered please return to :**
संपादक, 'किशोर' मासिक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
बालभारती, सेनापती बापट मार्ग,
पुणे- ४११ ००४.
दूरध्वनी : ०२०- २५७१६२४४
ई-मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in
वेबसाईट : www.kishor.ebalbharati.in